MANOOS (Weekly) : 80 Paise : Regd. No. M H–649

डी. बी. बांदोडकर ॲन्ड सन्स

पणजी

गोवा

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस, प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

# माणूस

१० मे १९६९
किंमत ४० पैसे


## नया शिवाला

सच कह दूं ऐ ब्रह्मन, गर तू बुरा न माने
तेरे सनमकदोंके बुत हो गये पुराने

अपनोंसे बैर रखना तूने बुतोसे सिखा
जंगो जदल सिखाया वाइजकोभी खुदाने

तंग आके मैंने आखिर दैरो हरमको छोडा
वाइजका वाज छोडा छोडे तेरे फसाने


पत्थरकी मूरतोंमें समझा है तू खुदा है
खाके वतनका मुझको हर जर्रा देवता है ।।



## नवे शिवालय

हे ब्राह्मणा ! जर तुला वाईट वाटणार नसेल तर एक खरी गोष्ट सांगूनच टाकतो. हे बघ तुझ्या मंदिरातील मूर्ती आता खूप जुनाट झाल्या आहेत. आपल्याच लोकांशी वैर करण्याची विद्या तू या मूर्तीपासून शिकलास आणि मुल्लाजीलासुद्धा खुदाने आपसांत कलह करण्याचाच मंत्र शिकविला. अखेर त्रस्त होऊन मी मशिद आणि मंदिर या दोघांचेही नाव टाकले. मुल्लाचा उपदेश आणि तुझ्या पुराणकथा दोघांचाही मी नाद सोडला.

" बहुढंगी शहरात बहुढंगी पोलीस हवेत. तसे झाल्यास अल्पभाषिक परप्रांतीयांना बहुभाषिकांपुढे निराधार आहोत अशी भीती वाटणार नाही, " अशी सूचना काँग्रेस अधिवेशनात अध्यक्ष निजलिंगप्पा यांनी केली. ही सूचना अमलात आली तर...



" हां ! हां ! श्रीनिवासन्, स्वत:वरील जबाबदारीच्या तुझ्या कल्पना अतिरेकी होत चालल्यात..."

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : पन्नासावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. मे, १

ता. १७ एप्रिलचे श्री. सुधीर सावंत (मुंबई) यांचे पत्र वाचले. ते लिहितात, ' या लेखांवर श्री. दळवी यांची वैयक्तिक पटले मर्यादेबाहेर चढता कामा नयेत. नाहीतर हे लिखाण दुसरी ' अन्टोल्ड स्टोरी ' होईल.' ब्रिगेडियर दळवी लिहितात तो ' इतिहास ' आहे. त्यात वैयक्तिक पटले नाहीत. ' आंधळे भक्त शिव्याशाप देऊन सत्य दडवण्याचा प्रयत्न करतात, पण इतिहास कुणालाही शिव्याशाप न देता सत्याचा झेंडा उंच फडकावतो, ' हे ब्रिगेडिअर श्री. दळवींचे वाक्य वाचून सुधीर सावंताचे समाधान झाले असेलच.

जनरल कौलची ' अन्टोल्ड स्टोरी ' एक थोतांड आहे. स्वतःवरचा दोष जन. कौलनी पं. नेहरूंवर लादला आहे. आणि असत्याचा झेंडा फडकवण्याचा प्रयत्न केला आहे. अशा ' अन्टोल्ड स्टोरी ' शी सुधीर सावंतानी या लेखाची बरोबरी करून ब्रिगेडिअर दळवींची थोडी उपेक्षाच केली आहे. ही ' अन्टोल्ड स्टोरी ' नव्हे ' ट्रू स्टोरी ' आहे.

शिवाजी सावंत, सोलापूर.

किंमत : ४० पैसे
१०२५ सदाशिव
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# जेव्हा क्रांतीला कार्यक्रम नसतो...

जेव्हा क्रांतीला कार्यक्रम नसतो, तेव्हा ती कोसळून पडत असते. युनिव्हर्सिटीमधले विद्यार्थी आणि कारखान्यांतले मजूर रस्त्यावर येऊन बॅरीकेड्स उभारतात आणि काही काळ समाजाचा श्वासोच्छ्वास् रोखल्यासारखा होतो; पण जेव्हा निःशब्द निवडणुकांतून लोकमत प्रकट होते, तेव्हा प्रचंड बहुमताने पुन्हा द गॉल निवडून येतो आणि तथाकथित क्रांतीचे अर्भक अर्थातच चिरडले जाते. मूलभूत लोकशाहीच्या प्रयोगाचा धिक्कार करीत रक्तपाताने सत्ता हस्तगत करू पाहणारी डाव्या-उजव्यांची संकल्पित क्रांती याह्याखानाच्या हातात सत्तासूत्रे आल्याबरोबर गर्भगळीत होते आणि परत सर्वसामान्य व्यवहार मुकाटयाने सुरू होतात. 'कॉंग्रेस

# ऑपरेशन सोमनाथ

बाबा आमटे



हटाओ'वाली आवळ्याभोपळ्यांची मोट काँग्रेस हटल्यावरोबर फाटते आणि परत जोडली जात नाही. आणि जेथे ती शाबूत असते तेथे नवमूल्यांचा, लोकशाहीचा, अथवा देशाचाच गळा ती आवळू पाहते.

जेव्हा क्रांतीला कार्यक्रम नसतो तेव्हा खरोखर अखेरचा सामान्य माणूसच सुळावर चढवला जात असतो. गोळीबारात मरतो तोच. घर त्याचेच जाळले जाते. देशोधडीला लागतात ती त्याचीच मुलेबाळे. नेते खुशाल असतात. त्यांच्या इस्टेटी व बँक अकाउंट्स परदेशांत सुखरूप असतात, अथवा प्रतिबंधक स्थानबद्धता पोलिसांच्या गोळीबारापासून त्यांचे आगाऊ संरक्षण करीत असते. लढताना सेनापती जसा मागे तसे हे क्रांतीचे सूत्रधार मागेच असतात. रेड्यांच्या व हत्तींच्या लढतीत चुराडा होतो तो गरीब बिचाऱ्या जंगलातल्या हिरवळीचा.

दुसरे असे की, खऱ्या क्रांतीची कधी उजळणी होत नाही. ती गिरवली जाऊ शकत नाही. एकदा झालेली क्रांती फार तर घोकंपट्टी करून आठवणीत ठेवली जाऊ शकते. पण खऱ्या क्रांतीचा नेहमी पुनर्जन्म होतो. नवा जीवनहेतू व नवे रूप घेऊन ती येते. आणि जन्म जेवढा कठीण होता तेवढाच हा पुनर्जन्मही खडतर असतो. बाळ—बाळंतीण दोन्ही दगावण्याची शक्यता असते. अशा वेळी हे अडलेले मूल शल्यक्रियेने काढण्याची आवश्यकता असते. शल्यक्रियेतली कापाकापी ही नव्या जीवनाला वाट मोकळी करून देणारी कापाकापी असते. तिला एक हेतू असतो. आणि एक कार्यक्रम असतो. क्रांती ही खऱ्या अर्थी अशीच एक शल्यक्रिया आहे आणि या क्रियेत राष्ट्राची नेतृत्वशक्ती ही सर्जनची भूमिका पार पाडीत असते. सर्जनची भूमिका ही खरोखर सर्जनाची, नवनिर्मितीचीच भूमिका असते. त्याच्या हातातील हत्यारे पाहून घाबरण्याचे कारण नसते. आपल्या भूमिकेबद्दल तो कितपत जागरूक व सावध आहे, ती भूमिका पार

पाडण्याचे साहस व कार्यक्षमता त्याच्याजवळ आहे की नाही, एवढे पाहायचे असते. आणि त्याने आधीच ह्या पुण्याईचा इशारा देऊन ठेवलेला असायला हवा असतो. त्याच्या खाती छोटी छोटी अशी असंख्य ऑपरेशन्स यशस्वीपणे पार पडलेली असायला हवी असतात. त्याचे हात, हृदय आणि मेंदू अनेक मायनर ऑपरेशन्स करून या मेजर ऑपरेशनसाठी तयार झालेले असायला हवे असतात. अशा सर्जनच्या हातात शस्त्रक्रिया आणि अशा नेतृत्वाच्या हातात क्रांती सुरक्षित असते. पण हेच हात अपरिपक्व असले म्हणजे रक्तमय अथवा रक्तहीन क्रांतीच्या कपाळी कपाळमोक्षच येतो—जसा तो फ्रान्समध्ये, पाकिस्तानात व भारतात आला !

**क्रांतीचे कलाकार कोठे आहेत ?**

आपापल्या जुन्या पोथ्यांतल्या पठडीप्रमाणे क्रांतीचा अर्थ लावणारे पुष्कळ आहेत. क्रांतीच्या दूरस्थ दृश्यांची रंगीबेरंगी छायाचित्रे टिपून मांडणारे कारागीर पुष्कळ आहेत. पोथी आणि प्रत्यक्ष परिस्थिती यांत फरक काय ? ऑईल पेंटिंग आणि रंगीत छायाचित्र यातले अंतर काय ? कलेला कारागिरीपेक्षा श्रेष्ठ ठरविणारे तिचे वेगळेपण कोणते ?

कलाकृती ही वस्तूची केवळ यथातथ्य अभिव्यक्ती नसते. ती वस्तूमागची कल्पना व्यक्त करीत असते. तिच्या मागचे जीवनाचे स्पंदन ती आपल्यापर्यंत पोचवते. ती कधीही, कशाचीही नक्कल असू शकत नाही. नव्या जगाच्या जन्मापूर्वी सर्वदूर उचंबळत असलेल्या या जीवनक्रांतीचे पठडीतले भाष्यकार पुष्कळ आहेत. निरर्थक म्हणून तिच्याकडे तुच्छतेने पाहणारेही पुष्कळ आहेत. पण तिला आपल्या प्रत्यक्ष आत्मप्रत्ययांचा अर्थ देणारे, या क्रांतीमागच्या महाकल्पनेचे तैलचित्र रंगवून दाखवणारे कलाकार कोठे आहेत ?

पण क्रांतीवरोबर तिचे नेतेही जन्माला येत असतात, हे एक ऐतिहासिक सत्य आहे. आधी अंडे की आधी कोंबडी

अशातलाच हा प्रकार आहे. या वादात न पडता या क्रांति-कारी नेतृत्वाच्या पाऊलखुणा कुठे दिसतात, हे पाहणे आवश्यक आहे.

क्रांतीचे द्रष्टे हे जुन्या पिढीतले असू शकतात, पण क्रांतीला नेतृत्व नव्या पिढीचेच लागते. क्रांती हा अखेर जुने आणि नवे यांचा एक उत्कट लढाच असतो. भविष्याने भूतकालाशी दिलेली ती निकराची झुंज असते. जुन्या पिढी-बरोबर तिचे सर्व रस्तेही म्हातारे झालेले असतात. तिने एके काळी प्राणपणाने जोपासलेली मूल्ये सुरकुतून गेलेली असतात आणि राखीव अरण्यातले सिंह जसे पाच फुटां-वरूनही पाहता येतात तसा या पिढीचा दबदवा निघून गेलेला असतो. आणि एखाद्या विदूषकाच्या तोंडून पर्वतीय–प्रवचन ऐकत असल्यासारखी नवी पिढी त्याच्या शब्दागणिक उपहासाने हसत असते. आता या शब्दांच्या नजरबंदीने तिला चकवता येत नाही. क्रांतीचा बाळकृष्ण या पूतना मावशीला फसत नाही. नेतृत्वाच्या या जुनाट मावशीला निवडणुकीच्या दिवसांतच अथवा मतलव असेल तेव्हाच पान्हा फुटतो. कोठेतरी आत तिने खूणगाठ बांधून ठेवलेली असते की, या बाळकृष्णाला अज्ञानात, दारिद्र्यातच ठेवायला हवे. भेदाभेदांचे विषारी स्तन्यच त्याला पाजायला हवे. तरच मते मिळतील, तरच आपला मतलब सुरक्षित राहील. काही धुपून गेलेल्या जमिनीसारख्या वांझ असतात. क्रांतीची गर्भ-धारणा त्यांना होऊ शकत नाही. त्यांना स्वतःचा असा पान्हा नसतो. मग ग्लॅक्सोचे वेबी–फूड घेऊन त्या बाळ-कृष्णाला भरवू पाहतात. या बाळाला रंजवण्याचे, सुख लावण्याचे नाना उद्योग त्या करतात. कधी त्या शताब्दया साजऱ्या करतात आणि पेंढा भरलेले काही वाघ-सिंहही प्रदर्शनात मांडतात. पण नव्या पिढीच्या लेखी हा सर्व माल केव्हाच पुराण वस्तूंच्या अजवखान्यात जमा झालेला असतो.

आणि जुन्याच्या विरोधात उभे ठाकलेले हे जे नवे असते

त्याचे स्वरूप आधी भीतिदायकच असते. नव्या अनोळखी शक्तीचा आविर्भाव हा सुरुवातीला भीतिदायक आणि विध्वंसकच असतो. सुरुवातीला अग्नी विध्वंसकच होता. अणुशक्ती असेच भीषण रूप घेऊन अवतरली. आकाशातून खाली येणारी वीजही विध्वंसकच ठरते.

नव्या जगाचे क्रांतिकारी नेतृत्व हे सुरुवातीला असे विध्वंसकच वाटणार. चंद्रावरच्या हरणांची शिकार करायला निघालेली ही पिढी आहे. नव्या जगाचे हे पहिले रहिवासी आहेत. त्यांची वर्तणूक त्या पुरातन आदिमानवासारखी राठ आणि जंगली वाटूही शकेल.

योगिराज भन्साळींनी एखाद्या अन्यायाविरुद्ध उपोषण करावे, तसे या जागतिक निर्घृणतेच्या विरोधात आणि शांतीसाठी ते हिप्पी जोडपे बेड-प्रोटेस्ट–शय्यानिषेध–सुरू करते. म्हणजे सात दिवसांपर्यंत एकाच खोलीत नुसते विवस्त्र झोपून राहायचे. या साऱ्या बेढब समाजाच्या थोराड मूल्यांचा ही पिढी असा उपहास करते. ही विकृती नव्हे, कळत, नकळत विडंबन केलेले आहे हे लक्षात घेतले पाहिजे. वैफल्य आणि असुरक्षितता यांच्या धारदार पात्यांच्या कैचीत ही नवी पिढी सापडलेली आहे. आर्थिक, वांशिक, कौटुंबिक, आत्मिक वैफल्याने व असुरक्षिततेने तिला पछाडलेले आहे. आणि जे या खाईतून तिला वर काढील आणि याच कैचीच्या भरंवशावर काळाचे वस्त्र कापून या पिढीच्या अंगावर त्याचा प्रसंगानुरूप साज चढवील, तेच उद्याचे नेतृत्व असेल.

ही पिढी अशांत आहे. पण जगात शांतता निर्माण व्हावी, अशी पोटदुखी या पिढीला जडल्याचे हे लक्षण आहे. या अशांत पिढीने शांत व्हावे म्हणून पेपर सोपे काढणे अथवा परीक्षा रद्द करणे हा ॲस्पिरिनने ट्यूमरची डोकेदुखी थांबवण्याचा प्रकार आहे. कुशल न्यूरो सर्जन जसा मेंदूच्या सातव्या कवचाआड दडलेले ट्यूमर बिनचूक काढतो तसे या डोकेदुखीच्या मुळाशी शिरावे लागेल. हे काम नव्या

नेतृत्वाचेच आहे. हे नेतृत्व सुरुवातीला बंडखोर वाटणे स्वाभाविक आहे. पण या बंडखोरीमागे एक हेतू आणि एक समर्पण भाव असेल. दडपण, मताग्रह आणि पद्धतबाजी ही जुन्या नेतृत्वाची लक्षणे होती; तर पद्धतबाजीऐवजी एक समर्पित स्वच्छंदता, मताग्रहाऐवजी वस्तुनिष्ठता आणि दडपणाऐवजी स्वयंस्फूर्तपणे स्वीकृत केलेली जबाबदारी ही या नवनेतृत्वाची वैशिष्टये असतील. हे नेतृत्व कुंचल्याच्या फटकाऱ्यांनी रंगवलेल्या चित्रासारखे (पॅचवर्क पेंटिंग) असेल. त्याला एक गणवेष असणार नाही. आणि तरीही ती एक चमू असेलच. आणि तिची काम करण्याची पद्धत ? त्याची कोणतीही एक पद्धत असणार नाही आणि साऱ्या पद्धती त्याच्या असू शकतील. अंतरिक्षयात्रिकाप्रमाणे वाट चालीतच रस्त्याची माहिती करून घेण्याचे तंत्र (Learning the route as you go ! ) हे त्याचे तंत्र असू शकेल. बुद्धीने निरीक्षण आणि आत्मस्फूर्तीने उड्डाण ही त्याची पुढे जाण्याची व नेण्याची शैली असू शकेल.

आज हा सर्व स्वप्नरंजित आणि गूढरम्य आशावाद वाटू शकेल. पण या आशावादाला प्रत्यक्ष प्रत्ययांचा एक खंबीर पाया आहे. एक उदात्त आणि सर्वमान्य हेतू पुढे ठेवल्या-बरोबर सामान्य माणसाच्या समूहातली ही नेतृत्वशक्ती कशी प्रकट होते याचा अनुभव मी घेतलेला आहे. तरुण पिढी झपाटून टाकील, आणि केंद्राकेंद्रांवर त्यांना उठवील, असा एक विशाल हेतू कोणता असू शकेल आणि तो तिच्या-पुढे कोण कसा ठेवू शकेल, हा खरा आपल्यासमोरचा प्रश्न आहे. या महान प्रश्नाचे जहाज स्वातंत्र्यानंतर अजून भटक-तेच आहे. त्याला उत्तराचा किनारा अजून गवसलेला नाही.

**जोड़ो भारत**

हे उत्तर शोधण्याचा एक अल्पसा प्रयत्न म्हणजे सोम-नाथवरून सुरू झालेली स्वयंस्फूर्त अशी श्रमसंस्कार छाव-ण्यांची अखिल भारतीय शृंखला ! मागील वर्षी तरुण

नवनेतृत्वाचा चेहरा त्या ठिकाणी पहिल्यांदा उमटला. या चेहऱ्याचा रंग कुठलाही लालपिवळा रंग नव्हता. असलाच तर त्याला धरित्रीचा रंग होता. त्याच्यावर कुठल्याही संप्रदायाचे लेबल डकवलेले नव्हते. असलेच तर जीवनाच्या भक्तीचा तो संप्रदाय होता. त्याचा स्वतःचा असा एखादा नारा नव्हता. असलाच तर एक मंत्र निःशब्दपणे त्या हजार तरुणांच्या हालचालीतून घुमत होता–एका पिढीपूर्वी 'छोड़ो भारत' या मंत्राने देशातल्या तरुणांना खडबडून घराबाहेर काढले होते. आता या मंत्राने शहरातल्या परीटघडीवाल्या, सुखासीन तरुण–तरुणींना जमीन, घाम, अश्रू आणि ढोरासारखे कष्ट अव्याहत उपसत राहणारी माणसे यांत आणून सोडले होते. त्या मंत्राने एक साम्राज्य सात समुद्रापल्याड भिरकावणारा प्रचंड उद्रेक निर्माण केला होता. या मंत्राने एका खंडतुल्य देशाचे तुकडे तुकडे झालेले मन सांधण्याचा प्रयत्न मातीच्या मुशीत सुरू झाला होता. जिकडे तिकडे 'तोड़ो भारत' चा हलकल्लोळ सुरू असता पहाटेच्या दवाने निःशब्द टपटपून गुलाबाचे ताटवे फुलवावे तसा हा मंत्र मनामनावर टपटपत होता–**जोड़ो भारत** हा तो मंत्र होता.

मंत्रांच्या ठायी प्रचंड सामर्थ्य असते असे म्हणतात. पण ते झोपलेले असते. ते जागे करणारी एक साधना असते. एक तंत्र असते. हे तंत्र या श्रमसंस्कार छावण्यांतून शोधले व घडवले जात आहे. भेदांच्या भिंतींचे रूपांतर विविधतेच्या वैभवात कसे करता येईल, त्याचे हे तंत्र आहे. राष्ट्रीय विध्वंसातून एक राष्ट्र नवनिर्माण मोर्चा कसा उभारता येईल त्याचे हे तंत्र आहे. क्रांतीच्या प्रसूतिवेदनेतून नव्या जगाचे बाळ सुरक्षितपणे जन्माला घालणाऱ्या एका मेजर ऑपरेशनचेच हे तंत्र आहे. आणि अखेर ते एक युद्धतंत्रही आहे. सुरुंग उडविण्यासाठी सुरक्षित ठिकाणी बसावे लागते. शत्रुपक्षाचेच सुरुंग जमा करून व त्याच्यावर उडवून त्यालाच जेर करता येते. पण हे सुरुंग उडवण्याआधीच जमा करा-

यला हवे असतात. त्यांचे स्फोट होण्याआधीच त्यांची अलगद सफाई करायच्या मोहिमेला ‘ सॉल्व्हेज ऑपरेशन ’ असे म्हणतात. विधायक कार्यक्रम हे तरुणांच्या स्फोटक शक्तीचे असे ‘ सॉल्व्हेज ऑपरेशन ’ आहे. एकीकडे खवळलेल्या समुद्राच्या दर्शनी भागावर प्रश्नांची व्यापारी जहाजे भटकत आहेत. विध्वंसाच्या युद्धनौका धावपळ करीत आहेत. आणि अशा वेळी त्यांनी पेरलेले सुरुंग गोळा करीत सोमनाथची मोहीम निघाली आहे. एका नव्या चेहऱ्याच्या नेतृत्वाने पाणबुडीसारखा सूर मारला आहे–आणि आता सगळ्या भटक्या समस्यांना सुरुंग लावीत ही पाणबुडी पुढे पुढे चालली आहे. आणि ज्या किनाऱ्यावर ती आपले डोके वर काढील तो अंतिम विजयाचा किनारा असेल. या सोमनाथच्या मोहिमेत सहभागी होणारे बहाद्दर कोण ? ○



# जनसंघ अधिवेशन

## आश्वासन आणि अपेक्षा

वर्ष १९५४ : स्थळ मुंबई : जनसंघ अधिवेशनासाठी त्या वेळी चांगली जागा येथे मिळू शकलेली नव्हती; आलेल्या प्रतिनिधींची साधी जेवणाखाण्याची सोयही सरकारी असहकारामुळे त्या वेळी नीटशी करता आलेली नव्हती. आणि पंधरा वर्षांनंतर आज ? हीच मुंबई या पक्षाच्या केशरिया रंगाने तीन दिवस अक्षरश: न्हाऊन निघाली, नगराचा कोपरान् कोपरा दीपाच्या प्रकाशान उजळून निघाला, आसमंत घोषणांनी दुमदुमून उठला, एखाद्या सत्ताधारी राजपुरुषालाही हेवा वाटावा अशा ऐश्वर्यात पक्षाचा तरुण अध्यक्ष राजपथावरून लाखलाख जनसंमर्दाच्या जयघोषात मिरवला गेला, सर्व वृत्तपत्रे कौतुकाने दुथडी भरून वाहत होती. सर्वसामान्य नागरिक तर या सोहोळ्याने दिपूनच गेला होता. सहसा राजकारणाच्या आडवाटेला न जाणारा निवडक उच्चभ्रूही या अनावर पण अनुशासित शक्तीच्या दर्शनाने कुठेतरी हडला होता, ' प्रतिगामी ', ' उजवे ', ' बुरसटलेले ', ' सनातनी ' या शब्दांनी आजवर हेटाळल्या गेलेल्या या पक्षाविषयी नव्याने काही विचार करण्याची आवश्यकता त्याला भासू लागली होती. महानगर मुंबईची प्रातिनिधिक प्रतिक्रिया आचार्य अत्रे यांच्या भाषणातून अखेरीस दिलखुलासपणे व्यक्त झाली. दीनदयाळ नगरात योजलेल्या सत्कारप्रसंगी आचार्य म्हणाले : ' महिन्यापूर्वी मी येथे आलो तेव्हा येथे निव्वळ माळरान होते. आपल्या कार्यकर्त्यांनी जणू काय मयसभाच निर्माण केली आहे. माझ्या गेल्या ५० वर्षांच्या राजकीय आयुष्यात मी अनेक सभा, संमेलने व राजकीय पक्षांची अधिवेशने पाहिली. परंतु या दीनदयाळनगरीची उभारणी, कालची प्रचंड मिरवणूक व राजकीय विषयांची चर्चा करण्यासाठी शांतपणे बसलेले हे २० हजार प्रतिनिधी, हे पाहून मी आश्चर्याने थक्क झालो आहे. '

सर्वानुमते हे अधिवेशन भव्य असेच झाले.

एवढे मान्य करूनसुद्धा मनात कुठेतरी थोडीशी सल शिल्लकच आहे. कारण जनसंघाच्या कार्यक्रमातील भव्यता व शिस्त एवढ्यावरच समाधान मानायला मनाची आता तयारी नाही. पक्षाचे नेतृत्व आता प्रगल्भ होत असल्याचे अधिवेशनात अनेक वेळा जाणवले. अध्यक्ष नासेर यांचा एका प्रतिनिधीने जरासा अधिक्षेपाने

उल्लेख करताच बाजपेयींनी त्या प्रतिनिधीला लगेच चापले. एखाद्या परक्या राष्ट्राच्या अध्यक्षांबद्दल असे अनुदार उद्‌गार काढणे कसे अयोग्य आहे हे पण त्यांनी लगेच प्रतिनिधींच्या ध्यानात आणून दिले. आज ना उद्या आपण अधिकारावर येणार आहोत, हा स्वतःच्या ठायी असलेला आत्मविश्वास या प्रसंगाने त्यांनी अनुयायांच्यापर्यंत पोचवला.

## लोकशाही व्यवहार

कार्यकारिणीने राज्य पुनर्रचनेसंबंधीचा ठराव मांडला. परंतु अनेक सहकाऱ्यांना त्यात फार मोठी चूक आहे असे वाटले. नेत्यांचा योग्य तो मान ठेवून अनेकांनी आपली मते निर्भिडपणाने मांडली. कार्यकारिणीने पण हा प्रश्न प्रतिष्ठेचा केला नाही व विरोधातील प्रामाणिकपणा व युक्तिवाद यांचा मान राखून ठरावात योग्य तो बदल केला. जनसंघात लोकशाही मार्ग व व्यवहार चांगला रुजत चालला असल्याचीच ही एक खूण मानावी लागेल. मध्यावधी निवडणुकांतील पराभवाची चर्चा करताना याच गोष्टीचा पुन्हा प्रत्यय आला. हरियानामधील भूतपूर्व मंत्री असो, बिहारमधील सामान्य स्त्री कार्यकर्ती असो, दोघांनीही आपल्या दोषांची मोकळेपणे चर्चा केली. प्रसंगी केंद्रीय नेतृत्वाचे काय चुकले, हे पण निर्भिडपणे सांगितले. पक्षाच्या कार्यकर्त्यांत एक प्रकारची maturity येत असल्याची ही लक्षणे दिसत आहेत. पण त्याच वेळी सामान्य कार्यकर्ता अजूनसुद्धा Nervous होतो व थोड्याशा टीकेने, खऱ्या वा खोट्या प्रचाराने हातपाय गाळतो, हे निवडणुका हरण्याचे कारण म्हणून पण सांगितले गेले. यावरून पक्षाला निर्भिड, चतुरस्र आत्मविश्वास असलेले कार्यकर्ते निर्माण करण्यासाठी खूप कष्ट केले पाहिजेत, हे ध्यानी येते.

आणि असे भव्य अधिवेशन म्हणजे कार्यकर्त्यांचा उत्साह व विश्वास वाढविण्याचे एक साधनच असते. जनसंघाने या संधीचा कसा फायदा घेतला याचा विचार केला तर थोडीशी निराशाच पदरी येते. राष्ट्रवाद हा तर जनसंघाचा आत्माच आहे. त्यामुळच अधिवेशनाच्या काळातच संरक्षणविषयक परिसंवाद घडवण्यात आला. परंतु जनतेच्या जिव्हाळ्याच्या अनेक प्रश्नांबाबत जनसंघास विशेष आच नसावी, असाही भास उत्पन्न झाला. अस्पृश्यता आम्ही मानणार नाही, एवढ्या घोषणेने वा बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार घातल्याने कार्यभाग झाला का? अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी चळवळ करणार म्हणजे काय, याचा उलगडा झाला नाही. आज अनेक क्षत्रांत, अनेक ठिकाणी जनसंघ अधिकारारूढ पक्ष आहे. या ठिकाणी जनसंघाने अस्पृश्यता निवारणासाठी विशेष कोणते परिश्रम घेतले याचा खुलासा का होऊ नये?

त्याचप्रमाणे योजना स्वदेशी हवी. म्हणजे नेमके काय? कारण इंदिरा गांधीही योजना स्वदेशीच हवी असे सांगत आहेत. केरळचे मुख्य मंत्री नंबुद्रिपाद जर योज-

(पृष्ठ १५ पाहा

| | | | | | | | | |

## □ अवघा धरता सुपंथ । मळा हिरवागार ॥

आसाममधील खासी, जैंतिया, गारो या पहाडी मुलुखाचे पहाडी राज्य लवकरच अस्तित्वात आणण्याचे इंदिराजींनी ठरविले आहे. या आसाम राज्यात २०० मिशनरी जनसेवा करतात. त्यांतले १०० या पहाडी मुलुखात काम करतात. आपल्या ' इंडिया 'चे हे खरोखर भाग्य होय की, सर्व जगातील येशू धर्मोपदेशकाचे लोंडेच्या लोंडे भारतात सरकारी कृपेने प्रतिवर्षी येत असतात. १९६८ साली कॉमनवेल्थ देशांतून केवळ २६३५ येशू धर्मोपदेशक आपल्या देशात आले; म्हणजे एवढ्यांची नोंद करण्यात आली ! नोंद न झालेले हजारोंनी असतील. जे राणीच्या कॉमनवेल्थमध्ये नाहीत, असे स्पेन, पोर्तुगाल, स्वीडन, डेन्मार्क इत्यादी देशांतून आलेल्या येशू धर्मोपदेशकांची संख्या ३७९६ अशी गेल्या वर्षी नोंदली गेलेली आहे. म्हणजे सरासरीने ७–८ हजार मिशनरी भारतात तूर्त जनसेवा करीत आहेत. दहा वर्षांपूर्वी ही संख्या १२–१५ हजार होती. परंतु आता स्थानिक जमातींतून हे काम करण्याकरिता माणसे पुढे येऊ लागल्याने परदेशांतून येणाऱ्या मिशनऱ्यांची संख्या थोडी कमी दिसते. परदेशांतून येणाऱ्या मिशनऱ्यांची संख्या कमी झाली असली तरी हे लोक भारतात प्रतिवर्षी जो पैसा आणीत होते, त्यात मात्र आता कल्पनातीत वाढ झालेली आहे. १९५६ साली फक्त ९ कोटी २२ लाख रुपयेच या मंडळींनी भारतात आणले. १९६७ साली ६६ कोटी ३० लाख रुपये आणले. गेल्या वर्षी ८० कोटी व चालू वर्षी १०० कोटी येतील, असा अंदाज आहे. कल्पना करा, फक्त सुमारे ६ हजार परकीय मिशनरी मंडळींनी या देशात १९६७ साली ६६ कोटी रुपये खर्च केले. गेल्या वर्षी ८० कोटी व चालू वर्षी १०० कोटी रुपये खर्च होणार आहेत.

भारत निधर्मी झाल्याचे पाहून या मंडळींचे अंतःकरण पिळवटले व या देशात यशूचा धर्म वाढविण्यासाठी ही माणसे इंदिराजी व चव्हाणांनी भारतात आणलेली असताना काही राज्यांचे मुख्यमंत्री या धोरणाला विरोध करतात हे काही चांगले नाही. देशविघातक हालचाली करतो या क्षुल्लक कारणावरून फादर फेरर यांना वसंतराव नाईकांनी ज्याप्रमाणे महाराष्ट्राबाहेर हाकलून दिले, त्याचप्रमाणे आसामच्या मुख्यमंत्र्यांनी खासी व जैंतिया टेकड्यांत जनसेवा करणाऱ्या शंभर मिशनऱ्यांपैकी फक्त पाच पाद्र्यांना आसामातून निघून जाण्यास सांगितल्याची दुःखद बातमी आली आहे. आसाम राज्याला या मिशनऱ्यांपासून धोका आहे, असे क्षुद्र कारण आसाम सरकारने दिले आहे. भारतात असलेल्या ६–७ हजार परदेशी मिशनऱ्यांपैकी ५ लोकच असे देशद्रोही आहेत. यावर जनतेचा विश्वास कसा बसावा? महाराष्ट्रातल्या फेरर देशद्रोह्याचे पुनर्वसन इंदिराजी–चव्हाणांनी आंध्रमध्ये केले. त्याप्रमाणे या आसामी पंचमहाभूतांचे इतर राज्यांत पुनर्वसन होईलही. परंतु इंदिराजी व चव्हाणांना असा सारखा त्रास देणे योग्य आहे काय, याचा काँग्रेसी मुख्यमंत्र्यांनी विचार करण्याची वेळ आली आहे असे आम्हांस वाटते. गादीवरचे ढेकूण सतरंजीखाली सारून शांतपणे 'पाईप' ओढणे आसामच्या मुख्यमंत्र्यांना मात्र शक्य झाले नाही! कारण १५,००० येशूपुत्रांनी एक प्रचंड मूकमोर्चा काढला. येशूपुत्रांच्या हाती फलक होते–" प्रभूच्या ऐश्वर्यासाठी मिशनऱ्यांना ठेवले पाहिजे," " आमच्या स्वास्थ्यासाठी मिशनऱ्यांची आम्हांला गरज आहे." या सर्व मंडळींनी आसाम व नागालँडचे राज्यपाल बी. के. नहरू यांना अर्ज सादर केला: " मिशनऱ्यांना हाकलू नका." ही सर्व मंडळी ख्रिश्चन होती. येशूकृपेने त्यांचा अन्नप्रश्न, वस्त्रप्रश्न सुटला असताना, त्यांनी निदान मिरवणूक काढण्याची तसदीही घेऊ नये, असे कसे बरे म्हणता येईल? या मंडळींचे गाऱ्हाणे राज्यपाल नेहरू–नेहरूकन्येच्या कानी घालून हा अन्याय दूर करतील, अशी आम्हांला आशा आहे.

सध्या १०० देशांत आपल्या परराष्ट्र कचेऱ्या आहेत. आणि या सर्वांचा सरकारी वार्षिक खर्च १० कोटी रुपये होतो. या मानाने जगातले येशूभक्त भारतातील फक्त ३५ कोटी निरक्षर दारिद्र्यपीडित जनतेसाठी जे ८०-१०० कोटी रुपये आता वर्षाला खर्च करीत आहेत, त्याबद्दल आपण सर्वांनी येशूचे आभार मानले पाहिजेत.

भारताच्या सीमेवरील भागात मिशनऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर लोकांना ख्रिश्चन केले तर देशाला धोका आहे, यातून ख्रिस्तिस्थानाची मागणी पुढे येईल, इंदिरा सरकार ती पुरी करील, अशी धास्ती काहीजणांना वाटते याचे मुख्य कारण आपल्या देशात अजून हिंदू बहुसंख्य आहेत हे होय! ही बहुसंख्या चटकन् नाहीशी करणे हा त्यावर खराखुरा उपाय आहे. आपल्या देशात ५० कोटी लोकसंख्या आहे. त्यातले ४० कोटी हिंदू आहेत. स्त्रिया, मुले व वृद्ध यांची संख्या वगळता

अर्थार्जनाची जबाबदारी असलेल्या हिंदूंची संख्या सुमारे २० कोटी होते. वीस कोटी लोकांचे संसार सुखाचे व्हावे यासाठी अमेरिकेने फुकट धान्य दिले व मिशनऱ्यांनी नटण्या-मुरडण्याकरिता कापडचोपड व वरखर्चासाठी दर महिन्याला काही कोटी रुपये आणले तर सर्वांनी बाप्तिस्मा घ्यायला काही हरकत आहे काय ? अर्थात ही गोष्टदेखील मिशनऱ्यांनी मनावर घेतली तरच होणार. तेव्हा इंदिरा गांधींनी शक्य तितके मिशनरी आपल्या देशात बोलावून घ्यावे व त्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्याची भाषा करणाऱ्या देशद्रोह्यांचा आवाज बंद करावा. इंदिरा गांधींचे सरकार ज्या अर्धपोटी अनाथ गिरीजनांकरिता काहीही करू शकत नाही; त्यांची सर्व सोय पाहणाऱ्या या मिशनऱ्यांचे आपण स्वागत केले पाहिजे.

भारतातील ३५ कोटी निरक्षर आणि केंद्र सरकार यांच्या सोयीसाठी मिशनऱ्यांनो तुम्ही इथेच राहा !

ख्रिस्तदास झालो, भिक्षा वाढा माई । हा घोष आसेतुहिमाचल एकदा सुरू झाला की मग कशाची ददात म्हणून राहणार नाही.

मिशनरी हाकी मोट, इंदिरा धरी धार ।
अवघा धरता सुपंथ, मळा हिरवागार ।।

असे उज्ज्वल स्वप्न निदान आम्ही तरी पाहत आहोत !

---

## □ "Go-ब्राह्मण !"

---

छत्रपती शिवाजी महाराजांच्या बिरुदावळीचा नेमका अर्थ काय, याचे संशोधन करीत असताना, आमच्या हाती एक जुने शिवकालीन दप्तर आले. या दप्तरात सापडलेला एकमेव कागद वाचून पाहिल्यानंतर आमची खात्री झाली – "गो-ब्राह्मण-प्रतिपालक" यातील 'गो' हा शब्द गाईला उद्देशून अथवा शेतीच्या बैल-जोडीला उद्देशून नसून त्याचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. आमच्या हाती आलेला शिव-कालीन कागद हा रायगडावर महाराजांना राज्याभिषेकाची मसलत चालू होती तेव्हाचा आहे. कागद असा आहे :

राजश्री.........यांचे सेवेसी –

स्नेहांकित येसाजीराव मोहिते जप्तन्मुरूक दंडवत.

रायगडी राजांची भेट जाहली. उदयकाळी राजे सदरेवरी बैसले असता कोणी दादोजी मास्तरांची आठवण काढली राजांनी स्तुती ऐकली - "दादोजी ते स्वामींचे गुरु" राजांनी स्मित केले. उद्गारले–"देव मास्तराने फार छळिले. मातोश्रींची इच्छा व कर्मगति त्यासी 'देव' म्हणणे चूक. तो तर कोंडदेव." राजे हसू लागले. सेवेकऱ्याने पुसिले–"स्वामींचे मनी काय आहे ?" राजे म्हणाले– "आम्हास

कोंडून घातले व बहुत छळिले. शिकवले नाहीच. म्हणोनी त्यास 'कोंडदेव' म्हणणे योग्य." राजाची बिरुदावली घेऊन फिरंगी वकील ते समयी तेथे आले. महाराज म्हणाले, "ब्राह्मणांपासून राज्यास धोका संभवतो. त्याणी राज्यांतून निघोन जावे. ऐसी समज देणारी बिरुदावली असावी." फिरंगी म्हणाला–"तुम्ही यवनास जैसे 'क्विट इंडिया' सांगितले तैसे ब्राह्मणास 'गो–ब्राह्मण' सांगावे." ऐसी मसलत झाली. महाराजांनी सांगितले, "यापुढे आम्हांस 'GO–ब्राह्मण' प्रतिपालक म्हणावे. अर्थ घ्यानी घ्यावा."

महाराजकालीन हा अस्सल कागदपत्र हाती आल्यामुळे, 'गो' म्हणजे शेती व ब्राह्मण म्हणजे विज्ञान असे नवीन नवीन अर्थ काढण्याची धडपड यापुढे व्यर्थ होय !

—ग्यानबा

---

# जनसंघ अधिवेशन

[पृष्ठ ११ वरून]

नेचा एक पर्यायी आराखडा देऊ शकतात तर या अधिवेशनाच्या निमित्ताने जनसंघाला तेच करता आले नसते का ?

मध्यप्रदेश, बिहार, हरियाना या प्रांतांत थोडा काळ का होईना जनसंघ अधिकारात होता. सक्तीचे धर्मांतर व लाचखोरी बंद करणे यासाठी जनसंघाने या ठिकाणी प्रत्यक्ष काय कार्य केले हे जनतेपुढे ठेवण्याची या वेळी नामी संधी होती. ती दवडली गेली असे वाटते. आणि दिल्लीसारख्या राजधानीच्या शहरी जनसंघ शासन काय करीत आहे ? पक्षाने दिलेली आश्वासने व पक्षाचे प्रत्यक्ष कार्य याचे सुस्पष्ट चित्र कार्यकर्त्यांच्या पुढे मांडणे आवश्यक होते.

एवढया मोठया डोळे दिपवून टाकणाऱ्या मिरवणुकीत आपण केलेल्या कार्याचे मुंबईतील जनतेला निरनिराळया दृश्यांच्या साहाय्याने दर्शन घडवणे अशक्य होते काय ?

सर्वत्र अराजकाची आणि फुटीरतेची बजबजपुरी माजली असता जनसंघाने आपल्या संघटित सामर्थ्याची चुणूक या अधिवेशनाच्या निमित्ताने मुंबईकरांनाच नव्हे तर साऱ्या देशाला दाखविली. हवालदील आणि उदासीन असलेल्या सर्वसामान्य माणसाला आशेचा, विश्वासाचा एक आधार यामुळे लाभण्याची शक्यता आहे हे मान्य करूनही कुठेतरी अजून जनसंघ जनतेच्या सामान्यापासून दूर आहे, अशी सारखी टोचणी लागून राहते ती अशा काही अपेक्षा पूर्ण होऊ न शकल्यामुळेच. पुढील अधिवेशनातून याही अपेक्षा पूर्ण होऊ शकतील काय ?

— नारायण भावे

— गोपाळ जोशी



वसू भगत

# स्मृतिदिन

## एक..........दोन..........तीन..........सत्तावीस

जगात सत्य एकच...
मृत्यू !
त्याच्याजवळ भेदभाव नाहीत.

त्याला कुणाचा मुलाहिजा नाही.

मग तो अहिंसेचा उद्गाता तथागत गौतम बुद्ध असो अथवा रक्ततृषार्त चेंगिज-खान असो; संगीतशत्रू औरंगजेब असो अथवा संगीतसम्राट तानसेन असो; काळाला सारे सारखेच !

त्याने नेतो म्हटल्यानंतर कुणालाही मागे राहता येत नाही. मागे राहणे शक्यच होत नाही. मागे उरते ते त्यांचे कर्तृत्व...त्यांच्या आठवणी.

या आठवणी आम्ही जपत राहतो. जोपासत राहतो. आमचे आपले सांभाळून जसे जमेल तसे. ज्या पद्धतीने जमेल त्या पद्धतीने.

मास्टर दीनानाथ गेले.

काळ त्यांना खेचून घेऊन गेला.

उरल्या आहेत त्यांच्या आठवणी. लताबाई, आशा, हृदयनाथ ही हिरेमाणके.

मास्टर दीनानाथांचे संगीतक्षेत्रातील कर्तृत्व अफाट होते, असे वडीलवारी मंडळी नेहमी सांगत असतात. आमच्या पिढीला दीनानाथांचे गाणे ऐकायला मिळाले नाही. त्यांची नाटकातली कामे पाहायला मिळाली नाहीत.

आम्ही पाहिले आहे ते रुबाबदार फेट्यातील त्यांचे छायाचित्र.

आम्ही ऐकल्या आहेत त्या त्यांच्या गाण्याच्या तीन मिनिटांच्या तबकड्या.

मृत्यूने दीनानाथांना गिळंकृत केले त्याला अठ्ठावीस वर्षे झाली.

मंगेशकर कुटुंबियांनी त्यांची सत्ताविसावी पुण्यतिथी २४ मार्चला रवींद्र नाट्य-मंदिरात साजरी केली. त्याचबरोबर बडे गुलाम अली खां यांची पहिली पुण्यतिथीही साजरी केली गेली.

कुणाच्याही पुण्यतिथीचा दिवस हा, खरा म्हणजे, फारसा सुखद क्षण नसतो. ज्या व्यक्तीची पुण्यतिथी असते त्या व्यक्तीच्या कुटुंबियांसाठी तर नसतोच नसतो. कारण, मृत्यूच्या अज्ञात भूमीत निघून गेलेल्या व्यक्तीशी त्यांचे अतूट ऋणानुबंध असतात. त्याचे हे निघून जाणे त्यांच्या जीवाला सलत असते. त्यांच्या निघून जाण्याने मागे उरलेल्यांना भोगावे लागलेले खडतर जीवन, झेलावे आणि भोगावे लागलेले घाव हे सारे सारे त्या क्षणाशी अतूटपणे बांधले गेलेले असते.

त्यामुळे मास्टर दीनानाथांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमावर, विशेषत: तो मंगेशकर कुटुंबियांनीच आयोजित केलेला असल्यामुळे, औदासिन्याची सावली पडली असेल असे वाटत होते.

पण, हे वाटणे काही खरे नव्हते.

कारण, प्रत्यक्षात तसा प्रत्यय कुठे येत नव्हता.

हा कार्यक्रम म्हणजे एक समारंभ होता. एक उत्सव होता.

त्याला इलाज नव्हता.

खाजगी आणि व्यक्तिगत गोष्टी सार्वजनिक स्वरूपाच्या झाल्या की असेच होत असते.

त्यातल्या भावना गौण होतात. उपचाराचा भाग तेवढाच प्रमुख ठरतो.

सार्वजनिक समारंभ म्हटला की त्याला कुणीतरी अध्यक्ष असावाच लागतो. कारण, तोही उपचारांचाच एक भाग असतो.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष आचार्य अत्रे होते.

आचार्य अत्रे यांचे वक्तृत्व वादातीत आहे. हजारो लोकांच्या सभेला ते तासन्तास नुसते खदखदा हसवत ठेवू शकतात. हजारो लोकांच्या सभेला ते तासन् तास एका जागी खिळवून ठेवू शकतात. पहाडासारखे व्यक्तित्व असलेला असा हा माणूस प्रसंगी अत्यंत भावनाप्रधान असे लहानसे भाषण करून श्रोत्यांना हलवूनही सोडू शकतो.

मास्टर दीनानाथांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमात आचार्य अत्र्यांनी केलेले भाषण लहानसे होते. सरळ, साधे होते.

मास्टर दीनानाथांची स्वरांवर विलक्षण हुकूमत होती. स्वर त्यांचे गुलाम होते. दीनानाथ स्वरांशी आणि गाण्याशी खेळत असत. स्वर त्यांच्याशी विनम्रतेने हात जोडून उभे राहत. लताबाई आणि आशा यांच्या आजच्या गाण्यांतून दीनानाथांच्या गायनपद्धतीची सारी वैशिष्टये प्रत्ययास येतात. इतकेच नव्हे तर त्यांच्या या दोन कन्या त्यांच्याहून काकणभर सरसच आहेत.

आचार्य अत्र्यांच्या भाषणाचा मथितार्थ हा एवढा.

सुप्रसिद्ध व्हायोलिनवादक लालगुडी जयरामन आणि त्यांच्या भगिनी श्रीमती यांची उपस्थिती हे या कार्यक्रमाचे वैशिष्टय होते.

लताबाईंनी स्वत: पुष्पहार अर्पण करून त्यांचे स्वागत केले.

श्री. लालगुडी जयरामन् यांचे व्हायोलिनवादन हे आजच्या कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण होते.

श्री. उमालयपुरम् शिवरामन् मृदंगाची साथ करीत होते.

श्री. लालगुडी जयरामन् यांनी व्हायोलीनवर हिण्डोलम् आणि नंतर कल्याणी हे दोन राग वाजवले. 'हिण्डोलम्'चे स्वरूप हिन्दुस्थानी संगीतातील 'मालकंस' रागासारखेच आहे. इतकेच नव्हे तर श्री. लालगुडी जयरामन यांनी हिण्डोलम्ची आलापी हिन्दुस्थानी पद्धतीनेच केली. त्यांचा कल्याणी मात्र तेवढा रंगला नाही. कल्याणीचा सारा मामला वरवरचा होता. तुटक आणि तकलादू होता.

नसीर अहमद खाँ यांनी सादर केलेला जोगकंसही असाच स्पर्श न करता गेला. त्यांनी घेतलेल्या काही जागा बऱ्या वाटल्या पण, एकूण काही फारसे खरे नव्हते. जोगकंसाच्या पाठोपाठ आलेल्या चंद्रकंसाचीही अवस्था तशीच होती. थोडाफार रंग ओतला गेला तो दादऱ्यात. "बहुत दिन बीते, पिया नहीं आये" हा दादरा त्यांनी छान रंगवला. द्रुतात आणि सुगम शास्त्रीय संगीतात नसीर अहमद खाँसाहेब अधिक रंगले.

सुलतान खाँ यांनी सारंगीवादन सादर करून मास्टर दीनानाथांना श्रद्धांजली वाहिली.

कुमारी शरद यामिनी व कुमारी पद्मासना यांनी नृत्य सादर केले. त्या लच्छू महाराज यांच्या शिष्या आहेत.

पण, क्षण जिवंत केले ते मात्र दोघांनीच. एक पंडित समताप्रसाद आणि दुसरे गोपीकृष्ण.

पंडित सामताप्रसादांसोबत त्याचे दोन पुत्र कैलासलाल आणि कुमारलाल होते. पंडितजींच्या बोटांत विलक्षण जादू आहे, यात संशयच नाही. ताल त्यांनी जणू आपल्या बोटांच्या टोकांत बांधूनच ठेवला आहे.

तीच गोष्ट गोपीकृष्ण यांची. ताल आणि लय त्यांच्या पायांत सामावलेली आहेत. त्यांच्या रक्तात भिनलेली आहेत.

कथ्थक नृत्य, त्यातील साऱ्या विविधतेसह आणि बारकाव्यांसह त्यांनी सादर केले. कथ्थक नृत्याच्या तांत्रिक अंगावरील गोपीकृष्ण यांची पकड विलक्षण घट्ट आहे. पदन्यासातील त्यांचे कौशल्य आणि चापल्य स्तिमित करून टाकणारे आहे.

नृत्यमुद्रा आणि भावाभिव्यक्ती विलक्षण लोभस आणि आकर्षक आहे.

त्यांच्या अभिव्यक्तीत विद्युल्लतेची दीप्ती आणि लवलव आहे.

मेघगर्जनेचा थरार आहे.

वांबूच्या कोवळ्या फांदीची लवचिकता आहे.

आणि जुईच्या फुलांची नाजुकताही आहे.

ते रंगमंचावर आले तेव्हा गायकांनी प्रेक्षागृह स्वरांनी नादवून सोडले होते.

ते आले आणि गायकांचे स्वर रवीन्द्र नाट्यमंदिराच्या वास्तूत आपोआप आपणहूनच विरून गेले.

मग, उरला तो पंडित सामताप्रसादांच्या तबल्याचा कडकडाट. पंडित रामदासांच्या पखवाजाचा गहिरा हुंकार आणि गोपीकृष्ण यांच्या घुंगरांची त्या तालात मिसळणारी छुमछुम...

गोपीकृष्णांनी या वेळी नवीन काही सादर केले असे नाही.

त्यांचे कार्यक्रम याआधी ज्यांनी पाहिले त्यांना यात नवीन असे काहीही दिसणे शक्य नव्हते.

पण, त्यांनी जे सादर केले ते डोळ्यांना सुखविणारे होते. मन उल्हसित करणारे होते.

ताल, लय आणि गती यांचा विलक्षण सुखद व चैतन्यपूर्ण मेळ त्यांनी साधला होता.

या कार्यक्रमात आणखी एक महत्त्वाची घटना घडली.

मास्टर दीनानाथांच्या बारा लोकप्रिय गाण्यांच्या एका दीर्घ ध्वनिमुद्रिकेचे या वेळी

प्रकाशन करण्यात आले. हिज मास्टर्स व्हॉईस या कंपनीने दीनानाथांची गाणी पुनर्मुद्रित करून नवीन दीर्घ ध्वनिमुद्रिका दीनानाथांच्या सत्ताविसाव्या पुण्यतिथीच्या निमित्ताने काढली आहे. कंपनीचे व्यवस्थापक श्री. विजयकुमार दुबे यांनी या ध्वनिमुद्रिकेची माहिती सांगितली. आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष आचार्य अत्रे यांच्या हस्ते ती श्रीमती माई मंगेशकरांना भेट दिली.

मास्टर दीनानाथ अठ्ठावीस वर्षांपूर्वी मृत्यूच्या अज्ञात प्रदेशात गेले.

गेल्या वर्षी बडे गुलाम अली खाँही निघून गेले.

आता फक्त त्यांच्या पुण्यतिथ्याच आम्ही साजऱ्या करू शकतो...

या वर्षी...पुढल्या वर्षी...त्याच्या पुढल्या वर्षी... ◻

## ललित कलादर्श

कमला नेहरू उद्यान !

मलबार हिलच्या माथ्यावर असलेल्या उद्यानातून क्षितिजापर्यंत पसरलेल्या पश्चिम सागरात बुडणारा सूर्य पाहणे हा माझा छंद होता.

सायंकाळच्या दाटणाऱ्या सावल्यांत गुरफटून जात मी अनेकदा हे सूर्यास्ताचे उत्कट दृश्य डोळ्यांत साठवून घेतले आहे.

पुढे टेकडीच्या पश्चिम उतरणीवर गगनचुंबी इमारती उभ्या झाल्या. पाण्यात कणाकणाने बुडत जाणारा सूर्य त्या इमारतींच्या आड गेला.

त्या सूर्यास्ताची सारी गम्मतच गेली आणि मी कमला नेहरू उद्यानाकडे फारसा फिरकेनासा झालो.

कधीमधी क्वचित तिकडे गलो तरी जाण्यात तसा फारसा उत्साह नसायचा. कारण, तिथे जायचे ते जीवात प्रसन्नता आणि आनंद भरून घ्यायला जायचे, असे मला वाटत होते.

त्या दिवशी मी फारफार दिवसांनंतर तिकडे गेलो.
आणि फारफार दिवसांनंतर जीव प्रसन्न झाला. आनंदून गेला.
हा आनंद सूर्यास्त पाहिल्याचा नव्हता.
पण, तितकेच मोलाचे काही तरी पाहायला मिळाले होते.
त्या उद्यानात आज एक व्यासपीठ उभारले गेले होते.
समोर खुर्च्या मांडल्या गेल्या होत्या.
संध्याकाळी चेहऱ्याला रंग लावण्यात गुंतणारी अनेक माणसे या संध्याकाळी रंग न लावता त्या खुर्च्यांत बसली होती.
तिथे श्री. केशवराव दाते होते.
बापू या घरगुती नावानेच ओळखले जाणारे मास्टर दत्ताराम होते.
तिथे श्री. मामा पेंडसे होते.
पद्मश्रीच्या किताबाने सन्मानित झालेले दाजी भाटवडेकर होते.
'ललित कलादर्श' या नाट्यसंस्थेतील एकोणऐंशी वर्षांचे नट श्री. यशवंतराव पिंगळे होते.
अशीच आणखी खूप माणसे होती.
व्यासपीठावर 'ललित कलादर्श'चे मालक श्री. भालचंद्र पेंढारकर आणि त्यांच्या पत्नी सौ. मालती पेंढारकर होत्या. मुंबईचे महापौर श्री. जमियतराम जोशी होते. त्यांच्या समोरच्या टेबलावर सुंदर आच्छादने होती. त्या आच्छादनांवरील सुबक फुलदाण्यांत फुलांचे सुंदर गुच्छ मांडले होते. एखाद्या सत्कार समारंभाला साजेसा असा हा देखावा होता.
कारण, इथे खरोखरच एक सत्कारसमारंभ चालला होता.
मुंबई महानगरपालिकेतर्फे हा समारंभ आयोजित केला होता.
या समारंभाचे आमंत्रक होते महापौर श्री. जमियतराम जोशी.
आणि जिचा सत्कार होता ती होती 'ललित कलादर्श' नाटक मंडळी.
गेले वर्षभर 'ललित कलादर्शचा' हीरक महोत्सव मुंबईत गाजतो आहे. त्या महोत्सवाची सांगता या सत्कारसमारंभाने झाली.
मुंबई महानगरपालिकेने याच कमला नेहरू उद्यानात अनेकांचे स्वागत केले. अनेकांचे सत्कार केले. पूर्वी राजांच्या प्रासादात एक वेगळा सत्कार-कक्ष असायचा, असे म्हणतात. कमला नेहरू उद्यानाला गेल्या काही वर्षांत असेच सत्कार–उद्यानांचे स्वरूप प्राप्त झाले आहे.
या सत्कार–उद्यानात एखाद्या मराठी नाट्यसंस्थेच्या गळ्यात सत्काराचे हार पडतील, असे कधी वाटले नव्हते. कारण, नाट्यसंस्था काही महत्त्वाच्या संस्था मानल्या जात नाहीत. नाट्यव्यवसायातली माणसे काही महत्त्वाचे पाहुणे किंवा राजकीय पुढारी नव्हते; की त्यांचा असा सत्कार केला जावा. [पृष्ठ ५९ वर]

## ट्रॅक्टर आणि बॉयलर

### चंद्रशेखर मराठे

# गव्हाच्या किमतींचा प्रश्न

१९६९–७० च्या हंगामासाठी केंद्रीय अन्न व शेती मंत्रालयाने गव्हाच्या खरेदी व विक्रीच्या किमती जाहीर केल्या आहेत. धान्याच्या बाबतीतला उत्तर विभाग मोठा करण्यात आला असून गहू पिकवणारा जवळजवळ सर्व प्रदेश त्यात समाविष्ट करण्यात आला आहे.

या किमती शेती माल किंमत महामंडळाच्या शिफारशींनुसार गत वर्षापेक्षा कमी ठरविण्यात आल्या आहेत. या शिफारशी करताना महामंडळाने पुढील गोष्टी विचारात घेतल्या.

१९६९–७० सालांत सरकारी खरेदीद्वारा ३६ लाख टन गहू सरकारजमा झाला पाहिजे. गत वर्षापेक्षा हे उद्दिष्ट २४ लाख टनांनी जास्त आहे. १९६८–६९ सालच्या गव्हाच्या हंगामात गव्हाची खुल्या बाजारातील किंमत सरकारी किमतींपेक्षा कधीही वर चढली नव्हती. त्यामुळे सरकारी खरेदीत कसलाही अडथळा आला नाही.

मात्र हंगामाविरहितच्या काळात चांगल्या गव्हाच्या किमती ७६ रुपयांवरून ९०–९५ रुपयांपर्यंत (दर क्विंटलला) चढल्या, हे लक्षात घेता शेती किंमत तज्ज्ञांचे मत असे आहे की, गव्हाच्या खरेदी किमती कमी करण्याचा सरकारी निर्णय योग्य नाही. हंगामानंतर चांगली किंमत येण्याच्या अपेक्षेने शेतकरी साठा धरून ठेवतील व सरकारला खरेदी करणे जड जाईल.

या अडचणीपेक्षाही गव्हाची योग्य किंमत कोणती हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. शेतकरी व ग्राहक या दोहोंना ही किंमत वाजवी वाटली पाहिजे, ही पहिली अट आहे.

उत्पादनखर्चानुसार गव्हाच्या किमती ठरविण्याच्या प्रयत्नांत अनेक अडचणी आहेत. मजुरी व व्यवस्थापनाचे कष्ट यांची किंमत, वेगवेगळ्या भागातील उत्पादन-खर्चातील तफावत, वगैरे प्रश्न किचकट आहेत; शिवाय उत्पादनखर्चावरून किमता ठरवताना सरासरी उत्पादनखर्च विचारात घेणे बरोबर नाही. कारण, त्यामुळे

काही शेतकऱ्यांचा फायदा होईल तर काहींचा तोटा होईल.

त्यामुळे हा प्रश्न निराळ्याच मार्गांनी सोडवावा, असे तज्ज्ञांचे मत आहे. गव्हाची किंमत निरनिराळ्या किमतपातळ्यांशी जोखून बघावी व अशा तुलनेतून जी वाजवी किंमत ठरेल ती विचारात घ्यावी, अशी ही पद्धत आहे. गव्हाच्या किमतींची अनेक प्रकारच्या किमतींशी तुलना करता येईल. उदाहरणार्थ.

- ☐ १९५२–५३ सालातील सरासरी किमतपातळी.
- ☐ १० वर्षांतील सरासरी सर्वसाधारण किमतपातळी.
- ☐ शेतकऱ्याला उत्पादन व उपभोग यांसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंची किमतपातळी.
- ☐ शेतीमध्ये वापराव्या लागणाऱ्या उत्पादक–घटकांची (इन्पुट्स) किमतपातळी.

या सर्व तुलनेमध्ये शेतकरी ज्या गोष्टी विकत घेतो त्यास किती किंमत द्यावी लागते व ज्या गोष्टी विकतो त्यास किती किंमत द्यावी लागते हे अजमावण्याचा प्रयत्न आहे.

अशा निरनिराळ्या तुलनात्मक अभ्यासातून गव्हाच्या निरनिराळ्या वाजवी किमती निष्पन्न होतात. वरील अनुक्रमाने त्या अशा–

दर क्विंटला
रु. ८१·११
रु. ७४·८२
रु. ७८·३३
रु. ८३·७५

या वाजवी किमती पाहता सरकारने जाहीर केलेल्या गव्हाच्या खरेदीच्या किमती योग्य नाहीत, असे मत व्यक्त होत आहे. वरील किमतींची सरासरी म्हणून व विविध बाजारपेठांची स्थिती लक्षात घेऊन गव्हाच्या सरकारी खरेदी–किमती दर क्विंटलला ७५ रु. ते ८४ रु. असाव्यात, अशी मागणी होत आहे!

शेतातील किमतींचा प्रश्न थोडा तांत्रिक वाटला तरी सर्वसाधारण आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. याचे साधे कारण असे की, आपली ७० हून अधिक टक्के लोकसंख्या निर्वाहासाठी शेती–क्षेत्रावर अवलंबून आहे. या क्षेत्राला केवळ ५० टक्के राष्ट्रीय उत्पन्नातच निर्वाह करावा लागतो–उरलेले ५० टक्के ३० टक्क्यांहून कमी असे बिगर शेतीक्षेत्र घेऊन जाते.

शेतीमालाच्या वाढत्या किमतींबाबत शहरी वर्तमानपत्रांत अनेकवार चर्चा होते. त्यामुळे याबाबत असा गैरसमज झाला आहे की, शेतीमालाच्या किमती अवाजवी आहेत. वस्तुस्थिती तशी नाही. धान्य उत्पादनाऐवजी शेतकरी, व्यापारी पिकांच्या मागे लागतात. यावरूनच धान्यउत्पादन किफायतशीर नाही, असा निष्कर्ष सहज काढता येतो. ○



# दुरंगी हेराशी सामना

अनंत भावे । । ।

एकोणीसशेचाळीस साल संपत आले होते. काही महिन्यांपूर्वीच, डंकर्कच्या जगप्रसिद्ध माघारीत ब्रिटिश फौजा फ्रान्सच्या किनाऱ्यावरून काढून घेण्यात आल्या होत्या. आक्रमक जर्मन सेना थेट डोव्हर-खाडीच्या पलीकडच्या काठावर येऊन थडकल्या होत्या. खाडीपलीकडे असलेल्या इंग्लंडचा धुक्यात वेढलेला दक्षिण किनारा, एखाद्या निरभ्र दिवशी, अंधुकपणे दिसतदेखील असे त्यांना. एखाद्या कसलेल्या तरैय्याने पोहत ओलांडावी इतकी छोटी खाडी होती ती. तिच्यापलीकडचे

महायुद्ध संपल्यावर जनरल आयसेनहॉवरने ज्याचा मुक्त-कंठाने गौरव केला त्या प्रसिद्ध 'हेरपकडच्या 'कर्नल अॅरेस्टो पिंटोने लिहिलेल्या 'Spycatcher' या पुस्तकातील एका कथेचा अनुवाद।

इंग्लंड गिळंकृत करण्यासाठी नाझी युद्धयंत्र आसुसले होते. कसलेले पायदळ, झंझावाती पॅंझरदळ, परिणामकारक तोफखाना आणि बेदरकार बॉम्बर्स यांनी सिद्ध झालेल्या अतिशक्तिमान युद्धयंत्रणेला, फक्त एका प्रचंड मोहिमेत इंग्लंडसारख्या पिढिजात दुश्मनाला धुळीला मिळण्याची संधी प्राप्त झाली होती. खाडी ओलांडून इंग्लंडला टाचेखाली तुडविण्याच्या या धाडसी मोहिमेचे सांकेतिक नाव होते 'ऑपरेशन सीलायन.' या स्वारीच्या योजनेत खुद्द हिटलर लक्ष घालीत होता.

हवाई टेहळी आणि युरोपमध्ये पेरलेले आमचे गुप्त हेर यांच्याकडून जर्मन मोहिमेच्या या बातमीला दुजोरा मिळाला. पडावांचे आणि छोटया बोटींचे प्रचंड ताफे ऑस्टेंड आणि लहाव्र यांच्यामधील किनारपट्टीवर जमा झाले होते. एकशेसाठ बॉम्बर्सची नॉर्वेमधून या खाडीच्या परिसरात खास बदली करण्यात आली होती. पा द कॅलेमध्ये, किनाऱ्यालगतच्या विमानतळावर. आखूड पल्ल्याच्या सूर मारणाऱ्या बॉम्बर्स ची वर्दळ वाढली होती. सर विन्स्टन चर्चिलनी पुढे आपल्या युद्धस्मृतींत म्हटल्याप्रमाणे, "तिथी आणि भरतीओहोटीदेखील इंग्लंडच्या आग्नेय किनाऱ्यावरील हल्ल्याला अनुकूल होती... सर्व गोष्टींचा विचार करता, ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांनी, जर्मन स्वारी तातडीने होण्याची बरीच शक्यता आहे, असा निष्कर्ष काढला होता.

सारी रात्र मी माझ्या कार्यालयात बसून काम करीत होतो. पहाट झाली तसा मी उठलो. हातपाय लांब करून झकास आळस झाडला. कडकडून जांभया दिल्या. मग जरा स्वस्थपणे दाढी केली. मी परत माझ्या टेबलापाशी येतो तोच गुप्तहेरखात्याचा एक तरुण अधिकारी घाईघाईने माझ्या खोलीत शिरला आणि अत्यंत औत्सुक्याने माझ्या हाती कागद ठेवीत म्हणाला, "साहेब, हा संदेश आला आहे आपल्याला."

मी तो कागद घेतला आणि खिडकीतून येणाऱ्या फिकट प्रकाशात धरून वाचला. कागदावरील संदेशाखाली सांकेतिक सही होती. आमच्या एका अत्यंत विश्वासू आणि हिकमती गुप्त हेराचा संदेश होता तो. ब्रिटिश फौजांनी युरोपमधून काढता पाय घेताना असे काही गुप्त हेर मागे पेरून ठेवले होते. संदेशात म्हटले होते, "आज रात्री ९।। वाजता एक जर्मन पाणबुडी झीब्रूहून निघेल. तिच्यात चार जर्मन हेर

असतील. पहाटेपूर्वी ते इंग्लंडच्या दक्षिण किनाऱ्यावर उतरतील. (नकाशाचा संदर्भ – ४३२९२५) या चारांची निवड मोठ्या कसोशीने केलेली आहे. ' ऑपरेशन सीलायन 'ला मदत करण्याच्या दृष्टीने त्यांची पक्की तयारी करून घेतली आहे.

मी त्या उत्साही तरुणाकडे पाहून हसलो. म्हणालो, " चला, तडक कामाला लागल्याशिवाय गत्यंतर नाही आपल्याला."

## कारस्थान हाणून पाडले

दक्षिण किनाऱ्याच्या एका भल्या मोठ्या नकाशाची आम्ही पाहणी केली आणि आमच्या हस्तकाने पुरवलेल्या नकाशासंदर्भाच्या साहाय्याने संदेशात निर्देशिलेली ती नेमकी जागा आम्ही शोधून काढली. त्या जागी लहानशी खाडी होती. समुद्राचे पाणी आत घुसून तेथे एक निवांत बंदिस्त जागा तयार झाली होती. या जागेच्या भोवती उंच कडे होते. यामुळे त्या जागेकडे सहज कुणाचे लक्ष जाणे शक्य नव्हते. जर्मनांनी आपल्या योजनेसाठी जागा तर मोठी नामी शोधून काढली होती. परंतु आमचे निरीक्षक या साऱ्याच किनारपट्टीवर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवीत होते. यामुळे जर्मन हेर सरळ मृत्यूच्या जबड्यात येणार होते. त्या अर्धचंद्राकृती खाडीच्या जवळपास खेडे राहू द्या, घरदेखील नव्हते एखादे. खाडीतून पुढे भूमीवर यायला फक्त एक वाट होती. नकाशाने ती तुटक रेषेने दर्शित केली होती.

सकाळीच माझ्या सहकाऱ्यांची मी एक लहानशी बैठक घेतली आणि येणाऱ्या जर्मन हेरांचे हार्दिक स्वागत करण्यासाठी एक समिती नेमून तिला आवश्यक त्या सूचना दिल्या. अंधार पडल्यावर निवडक माणसे खाडीच्या किनाऱ्यावर लपून बसली आणि काहींनी पुढे भूमीकडे येणाऱ्या वाटेची नाकेबंदी केली. त्यामुळे किनाऱ्यावरून कोणी निसटलेच तरी त्याला पलीकडे येणे शक्य होणार नव्हते.

किनाऱ्यापासून अर्ध्या मैलावर जलपृष्ठावर आलेली जर्मन पाणबुडी कोणी पाहिली नाही, की कोणी कसला आवाजही ऐकला नाही. रबराच्या घडीच्या होड्या-तून हे चार हेर ठरलेल्या जागी आले ते मात्र माझ्या सहकाऱ्यांच्या नजरेतून सुटले नाहीत. किनाऱ्यावर उतरून काही पावले ते चालले असतील नसतील इतक्यात त्यांना गिरफदार करण्यात आले. एकजण मात्र कितीतरी वेळ किनाऱ्यावरील खड-कात लपून बसला होता; पण त्यालाही अचूक टिपण्यात आले.

एकमेकांशी त्यांना संगनमत करता येऊ नये म्हणून प्रत्येकाला वेगळ्या मोटारीं-तून लंडनला माझ्याकडे आणण्यात आले. त्या वेळी सकाळ झाली होती. हस्तकाने संदेश पाठवून चोवीस तासांवर थोडाच अवधी झाला असेल तितक्यात मार्गी लाग-लेले एक जर्मन कारस्थान आम्ही हाणून पाडले होते. त्या संशयास्पद हेरांना अटक झाली होती. आमच्या तळावर येताच प्रत्येक हेराची कसून झडती घेण्यात आली. नंतर काही जुजबी प्रश्न विचारल्यावर प्रत्येकाला वेगळ्या कोठडीत ठेवण्यात आले. आणि यानंतर प्रत्येकाच्या सम्यक उलटतपासणीला मी सुरुवात केली.

त्यांच्यातील एकाने सुरुवातीलाच आपला गुन्हा कबूल केला आणि आपला कबुलीजबाब लिहून दिला. उरलेल्या तिघांची नावे पुढीलप्रमाणे होती : वॉल्डबेर्ग, मायर, व्हान दर कायबूम.

ज्या परिपूर्णतेने त्यांना शिक्षण देण्यात आले होते आणि त्यांच्या सामग्रीची सिद्धता केली होती ती पाहून मला थोडे आश्चर्य आणि थोडे भयही वाटले. त्या प्रत्येकाचे कपडे इंग्लिश कापडाचे तर होतेच, पण शिवाय ते इंग्लिश शिंप्याने बेतलेले होते. इतकेच नव्हे तर त्यांच्या छातीवरील खिशाच्या आतील बाजूला चक्क लंडनमधील प्रसिद्ध शिंप्यांची लेबले झळकत होती ! त्यांच्याजवळ नोटा व नाणी या दोन्ही स्वरूपांतील ब्रिटिश चलन पुष्कळ होते. खास परदेशी माणसांसाठी असलेल्या करड्या रंगाच्या ओळखपत्रांसारखीच ओळखपत्रेदेखील त्यांच्याजवळ होती. त्यांत आवश्यक ती माहिती व्यवस्थित होती. शिवाय त्यावर सहीशिक्कादेखील होता ! या तिन्ही हेरांजवळ अत्यंत प्रभावी बिनतारी संदेशक्षेपक होते. या साऱ्या देखाव्याची शान एकट्या वॉल्डबेर्गने बिघडवली. तळांना खिळे मारलेले भक्कम सैनिकी बूट घातले होते त्याने. त्यांच्या एकूण वेषभूषेत एवढाच दोष आढळला मला !

आमच्या हस्तकाचा संदेश वेळेवर मिळण्यात जर घोटाळा झाला असता तर या हेरांनी गुप्तपणे देशात शिरून केवढा धुमाकूळ घातला असता. आपल्या संदेशक्षेपकांच्या साहाय्याने आमच्या किनारी संरक्षणाच्या आणि मोहिमेला तोंड देणाऱ्या इतर योजनांची तपशीलवार माहिती त्यांनी जर्मनीला कळवली असती. त्यांना पकडण्याला मग काही दिवस वा कदाचित काही आठवडेही लागले असते. तोपर्यंत व्हायची ती हानी होऊनही गेली असती.

उलटतपासणीत वॉल्डबेर्गचा अनुक्रम पहिला होता. त्याने जरी साधे कपडे केले होते तरी तो चांगला मुरलेला धंदेवाईक जर्मन सैनिक दिसत होता. त्याचे ते भक्कम डोके, रुंद खांदे आणि कणखर पाठ पाहिल्यावर हे कोणालाही उमगण्यासारखे होते. त्यानेदेखील आपण जर्मन असल्याचे सुरुवातीलाच कबूल केले. परंतु लगोलग त्याने जे कल्पित कथेचे भारूड ऐकवले त्याने माझी पुष्कळच करमणूक झाली. तो म्हणे डाव्या पक्षाचा असल्यामुळे नाझींनी त्याची जर्मनीमध्ये ससेहोलपट केली; तिला भिऊन एकोणीसशे अडतीस साली तो इंग्लंडला स्थायिक झाला. आता मे महिन्यात तो व्यापारी कामानिमित्त बेल्जमला गेला होता; झंझावाती जर्मन फौजांनी अकस्मात बेल्जम पादाक्रांत केले आणि त्याला लंडनला परतणे अशक्य झाले; नंतरचा काळ त्याने लपूनछपूनच काढला; आणि आदल्या दिवशी, संधी मिळाल्यावर एका घडीच्या रबरी बोटीतून डोव्हरची खाडी पार करून तो इंग्लंडच्या किनाऱ्यावर उतरला आणि आता माझ्यासमोर उभा होता.

" अच्छा !" मी म्हटले, " आपली कथा मोठी मनोरंजक आहे. त्या संदर्भात, मि. वॉल्डबेर्ग, मी आपल्याला काही प्रश्न विचारल्यास आपली हरकत नाही ना ?"

त्याने मान हलवून हरकत नसल्याचे दर्शविले.

" आपण म्हणालात की आपल्या राजकीय निष्ठेसाठी जर्मनी सोडावी लागली आपल्याला. आपण एक सच्चे साम्यवादी आहात, नाही का ? शिवाय आपल्याला इंग्रजी भाषाही येते आहे. मग साम्यवादी चळवळीतली एक सुप्रसिद्ध इंग्रजी घोषणा पुरी सांगाल मला आपण ? घोषणा अशी आहे–' जगातील सर्व कामगारांनो एक व्हा...' पुढं काय ?"

वॉल्डबेर्गने माझ्याकडे पाहिले. त्याच्या चेहऱ्यावर कसलीच प्रतिक्रिया उमटली नव्हती. तो अगदी कोरा होता.

" प्रयत्न करा तुम्ही. " मी त्याला प्रोत्साहन देत म्हणालो, " डाव्यांची ही मोठी प्रसिद्ध घोषणा आहे आणि लाक्षणिक अर्थानं ती प्राप्त परिस्थितीत तुम्हांला अगदी अचूक लागू पडेल. "

" ही घोषणा, मला वाटतं, मला माहीत नसावी, " वॉल्डबेर्ग पुटपुटला.

" काही हरकत नाही. मी सांगतो ती आपल्याला. अशी आहे ती घोषणा : ' जगातल्या सर्व कामगारांनो एक व्हा. एक व्हा. त्यामुळं पायातल्या साखळदंडां-पलीकडे तुम्ही काही गमावणार नाही. ' निष्ठावंत साम्यवादी असूनही आयुष्यात आपण ही प्रसिद्ध घोषणा ऐकलेली नाही याचं मला मोठे आश्चर्य वाटतं मि. वॉल्डबेर्ग. पण जाऊ द्या. आपण दुसरा प्रश्न विचारात घेऊ. आपण आत्ताच म्हणा-लात की, आपण दोन वर्षं . लंडनमध्ये स्थायिक होता म्हणून. म्हणजे लंडनची चांगली माहिती असेल तुम्हांला नाही ?"

" होय तर. "

" मग भुयारीमार्गानं आपण पिकॅडिलीहून पश्चिमेला चालला आहात अशी कल्पना करा, आणि क्रमानं पहिल्या तीन स्टेशनांची नावं सांगा मला. हे तर नक्कीच जमायला पाहिजे आपल्याला. "

वॉल्डबेर्गने क्षण-दोन क्षण नीट विचार केला. मग तो म्हणाला, " गेल्या काही महिन्यांत बहुधा मी विसरून गेलो असणार ती नावं. पण पाहतो प्रयत्न करून... पहिल्या स्टेशनचं नाव, मला वाटतं, ' लेस्टर स्क्वेअर '; मग ' ऑक्सफर्ड प्लेस '; ...मग...नाही हे तिसऱ्या स्टेशनचं नाव नाही आठवत मला. "

" कसं आठवेल मि. वॉल्डबेर्ग ?" मी म्हणालो, " तुमच्या अर्धवट उत्तरावरून-देखील कोणालाही वाटेल की, तुम्ही कधीच त्या भुयारी मार्गानं प्रवास केलेला नाही. व्यक्तिशः मलासुद्धा हे ' ऑक्सफर्ड प्लेस ' हे काय प्रकरण आहे माहीत नाही. ' ऑक्सफर्ड सर्कस ' ठाऊक आहे मला; ' ऑक्सफर्ड स्ट्रीट ' सुद्धा ठाऊक आहे; पण ' ऑक्सफर्ड प्लेस ?'... हे नाही बुवा आपल्याला ठाऊक. मि. वॉल्डबेर्ग, हे प्रश्नोत्तरांचं खटलं आपल्याला जरा कठीणच वाटतंय, नाही का ? बरं. आपण

आता आणखी एकच, अगदी साधा प्रश्न विचारू. चालेल? तुम्ही म्हणालात की आपण थेट बेल्जम-पासून इंग्लंडपर्यंत रबरी होडी वल्हवीत आलो म्हणून. बरोबर आहे ना?

"होय."

"वा: कमाल आहे तुमची. हे एवढं जवळजवळ शंभर मैलांचं अंतर होडी वल्हवीत काटायचं म्हणजे काही साधं काम नाही... मला जरा हात दाखवता का तुमचे, मि. वॉल्डबेर्ग?"

त्याने आपले हात माझ्यापुढे पसरले. त्याचे हात रुंद, घट्ट आणि मजबूत होते. बोटे आखूड आणि बोथट होती. त्याच्या मनगटा-जवळची तळहाताची कातडी मी चाचपून पाहिली. ती घट्ट होती. सतत शस्त्र हाती वागवणाऱ्या सैनिकाची असते तशी. पण एवढेच.



"या हातांनी शंभर मैलांचं अंतर कापलं असं वाटत नाही"

मी नापसंतीने मान हलवीत म्हणालो, "छे छे छे, मि. वॉल्डबेर्ग, हे काही खरं नाही. हे पटावं कसं कोणाला? तुमच्या म्हणण्याप्रमाणं तुम्ही आणि तुमचे दोस्त यांपैकी प्रत्येकाकडं एक एक रबरी होडी होती. तुमचं म्हणणं खरं असेल तर प्रत्ये-काला स्वत:ची होडी वल्हवतच ही खाडी पार करावी लागली असणार. नाही का?...यावर तुम्ही काय म्हणणार ते ठाऊक आहे मला. तुम्ही म्हणणार, पाण्या-तल्या प्रवाहांनी आपल्याला मदत केली म्हणून. पण अहो, प्रवाह झाले तरी अगदी वल्हवण्याची गरजच भासणार नाही इतकी आणि अशी कशी मदत करणार ते? खरं की नाही? म्हणजे एवढ्या अंतराचा बराचसा भाग स्वत:च वल्हं मारीत काटावा लागला असेल तुम्हांला, पण तुमच्या या हातांवर तर त्याची पुसटशीसुद्धा खूण नाही म्हणतो मी. इतकं वल्हवल्यानंतर तळहातांची दशा झाली असती तुमच्या! अहो, त्यांच्यावर आलेल्या फोडांवर आणखी फोड आले असते महाशय!...हां, तुम्ही रबरी होडी वल्हवलीत हे मान्य आहे मला. पण किती?...एक शंभर-दोनशे कदम. तुमची पाणबुडी जिथं पाण्याबाहेर आली तिथून इंग्लंडच्या किनाऱ्यापर्यंत.

काय मी म्हणतो तसाच प्रकार आहे की नाही ?"

" नाही. नाही. नाही." त्याने निक्षून सांगितले.

असे बराच वेळ चालले. मला वॉल्डबेर्गचे कौतुक वाटत होते. तो शर तर होताच; आणि एका मर्यादित अर्थाने चांगला जर्मनदेखील होता. त्याने आपण होऊन या धोकेबाज मोहिमेत भाग घेतला होता; आणि आता बाजी उलटल्यानंतरही तो सहज, विनाप्रतिकार शरणागती पत्करायला तयार नव्हता. इतर अनेक कसलेल्या जर्मन सैनिकांना लाभले होते तसे कडवे शिक्षण त्याला लाभले नसावे; शिवाय त्याचा स्वभावही या प्रकारच्या मोहिमेला अनुकूल नव्हता. म्हणूनच या अशा चमत्कारिक परिस्थितीत त्याची अवस्था केविलवाणी झाली. हजरजबाबीपणाने तो एखादी अभिनव कथा आयत्या वेळी रचू शकला नव्हता. सर्वसाधारणपणे शत्रूच्या हेरांच्या बतावणीत बोटचेपी जागा इतक्या सहज सापडत नसे. परंतु वॉल्डबेर्ग धंदेवाईक सैनिक होता; धंदेवाईक, प्रशिक्षित गुप्त हेर नव्हता. आपल्या कबुलीजबाबात त्याने मोठ्या घोडचुका केल्या, त्यांत अनेक विसंगती होत्या. परंतु तरीही आपण हेर नाही हे तुणतुणे तो हिंमतीने वाजवीतच राहिला.

अखेर आपण हरलो याची जाणीव त्याला झाली. आपल्या कहाणीवर कोणाचाच विश्वास बसणे सुतराम शक्य नाही, हे त्याला कळून चुकले. पण त्यामुळे तो उद्ध्वस्त झाला नाही. त्याला धीराने तोंड देण्याइतका खंबीर तो खचितच होता. त्याने हलकेच खांदे उडवले आणि आपला पराभव कबूल केला. मग आपल्या अवयवांवरचा ताण त्याने मोकळा केला. खुळ्यासारखा इतका वेळ तो दक्ष पवित्र्यात ताठ उभा होता आणि उत्तरे देत होता. त्या पवित्र्यामुळेसुद्धा तो मुरलेला सैनिक आहे, हे कोणालाही सहज उमगण्यासारखे होते. पण आता तो खुर्चीत अवयव सैलावून बसला आणि अनेक वेळा देऊ केलेली जी सिगारेट त्याने आत्तापर्यंत निग्रहाने नाकारली होती ती आता सहज स्वीकारली. त्याने एक मोठा झुरका घेतला आणि धुरावरोवर आपला निग्रहदेखील सोडला.

## फाशी नको, गोळी घाला !

" ठीक आहे." तो अखेर म्हणाला, " मी हेर आहे. मी कबूल करतो तसं." आता तो जर्मन भाषेत बोलू लागला. आपले मोडकेतोडके इंग्रजी त्याने बाजूला ठेवले, " मला एक सांगा, इंग्लंडमध्ये हेरांना फाशी देतात की गोळी घालून ठार करतात ?"

" आमच्याकडं हेरांवर खटला भरून तो नागरी न्यायालयात चालवला जातो." मी उत्तर दिले, " हा खटला पूर्ण निःपक्षपातीपणानं चालतो; इतकंच नव्हे तर हेराला त्याची बाजू मांडण्यासाठी वकीलसुद्धा देतो आम्ही, तो दोषी आहे असं सिद्ध झालं तर त्याला फासावर चढवलं जातं."

" खरं तर मी एक सैनिक आहे. आणि ते तुम्ही अगोदरच ओळखलं आहे."

वॉल्डबेर्ग म्हणाला, "फाशीपेक्षा गोळी खाऊन मरणं अधिक पसंत आहे मला. कारण ते मरण मला अधिक मानाचं वाटतं."

. "माफ करा" मी म्हटले, "पण आपल्याकरता कायदा बदलता येईल की नाही याची शंका वाटते मला. पण आपला एवढा आग्रहच असेल तर मी त्या दृष्टीनं नक्की प्रयत्न करीन."

"खरंच करा." तो तत्परतेने म्हणाला. त्याच्या धैर्याचे कौतुक न वाटणे कसे शक्य होते. या माणसाची हिंमत असणारी अनेक माणसे जर हिटलरच्या पाठीशी असतील तर हे युद्ध आपल्याला भलतेच बिकट होणार आहे, असा विचार माझ्या मनात आला.

आणखी थोड्या प्रयत्नांनंतर वॉल्डबेर्गने मला सगळी हकीकत स्पष्टपणे सांगितली. जनरल रोमेलच्या रणगाडादलात वॉल्डबेर्ग एक वरिष्ठ अधिकारी होता. काही महिन्यांपूर्वी मे-जूनमध्ये, रोमेलच्या या रणगाडादलाने फ्रान्समधील ब्रिटिश फौजांना पळता भुई थोडी केली होती. ही बहुसंख्य फौज इंग्लंडला सुरक्षित पोहोचली हे दुसऱ्या महायुद्धातील एक आश्चर्य होय. या प्रसंगानंतर काही दिवसांनी जर्मन सेनेत, इंग्रजी बोलू शकणाऱ्या स्वयंसेवकांचा शोध वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केला होता. या स्वयंसेवकांवर एक विशेष कामगिरी सोपवली जाणार होती. वॉल्डबेर्गने आपले नाव दिले, आणि त्याची निवडही झाली. लगबगीने उभारलेल्या, हेरगिरीचे शिक्षण देणाऱ्या शाळेत प्रशिक्षणासाठी त्याला पाठवण्यात आले. तेथे लढाईच्या धुमश्चक्रीत बिनतारी-संदेशक्षेपणाचे काम कसे करावे याचे तपशीलवार शिक्षण त्याला देण्यात आले. वॉल्डबेर्ग आणि त्याच्या बरोबरच्या इतर विद्यार्थ्यांना शस्त्रविद्या शिकविण्याची वेगळी गरजच नव्हती. कारण ते सगळे झुंझार जर्मन सेनेतील अनुभवी सैनिक होते.

'ऑपरेशन सीलायन' अथवा 'इंग्लंडची मोहीम' प्रत्यक्षात येण्याआधी काही दिवस इंग्लंडमध्ये पाठविले जाईल, अशी सूचना त्यांना दिलेली होती. इंग्लंडमध्ये गेल्यावर त्यांनी इंग्लंडच्या किनारी संरक्षण व्यवस्थेची बारीकसारीक माहिती जर्मनीत कळवावी, अशी अपेक्षा होती. त्याचबरोबर इंग्लंडच्या भूमीवर पाय ठेवणाऱ्या जर्मन सेनेला तोंड देण्यासाठी अंतर्भागात जी खास प्रतिकार-योजना आखलेली असेल तिचाही तपशील त्यांनी पुरवायचा होता. इंग्लंडहून या हेरांना परत घेऊन जाण्याची कसलीच योजना जर्मन हेरखात्याने आखली नव्हती. इंग्लंडवरील स्वारी निश्चितच यशस्वी होईल असा बहुधा त्यांचा विश्वास असावा. त्यामुळे एकदा जर्मन सेना इंग्लंडच्या भूमीवर पाय रोवून उभी राहिली म्हणजे या हेरांनीच पुढे होऊन आपली ओळख पटवावी, असे ठरले होते. या विलक्षण साहसी कृत्याबद्दल खुद्द हिटलरकडून त्यांची संभावना करण्यात येईल अशी आशा त्यांना लावण्यात आली होती.

## हेराशी हस्तांदोलन

वॉल्डबेर्ग आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या दुर्दैवाने, जसे कल्पिले होते तसे घडले नाही. परंतु त्याने वॉल्डबेर्ग फारसा विचलित झाला नव्हता. लढाईत मृत्यू येण्याची शक्यता सैनिक नेहमीच गृहीत धरत असतो, असे तत्त्वज्ञान त्याने मला ऐकवले. फक्त एखाद्या सामान्य गुन्हेगारासारखे कदाचित आपल्याला फाशी दिले जाईल, याबद्दल व्यक्तिशः त्याला फार खेद वाटत होता. परंतु हादेखील, अखेर युद्धाच्या खेळातील अटळ दैवभाग होता. मात्र आणखी थोड्याच दिवसांत जर्मन सेना इंग्लंड पादाक्रांत करील, असा विश्वास त्याला वाटत होता. म्हणून त्याचा खटला आणि शिक्षा घाईघाईने कार्यान्वित झाली नाहीत तर कदाचित येणाऱ्या जर्मन सेनेकडून त्याची सहज सुटकाही होईल, असेही त्याने मला वजावले.

कितीतरी वेळ चाललेली ही उलटतपासणी संपली. वॉल्डबेर्ग जाऊ लागला. आणि माझ्या प्रदीर्घ कारकीर्दीत एखाद्या शत्रूच्या हेराच्या बाबतीत क्वचितच केलेली एक गोष्ट मी...केली. मी चक्क वॉल्डबेर्गशी हस्तांदोलन केले. कारण वॉल्डबेर्गजवळ धैर्य होते; आणि धैर्य, मग ते कोठेही का आढळेना, ते आदरणीय आहे, अशी माझी श्रद्धा होती.

वॉल्डबेर्गने पुरवलेल्या माहितीमुळे माझी बाजू बळकट झाली होती. त्यामुळे मायरला नमवण्यात मला अल्पावधीतच यश आले. मायरदेखील वॉल्डबेर्गप्रमाणेच मठ्ठ पण शूर प्रातिनिधिक जर्मन सैनिक होता. मी त्याला प्रश्न विचारायला लागून पुरती पंधरा मिनिटे होण्याच्या आतच आपण हरलो हे त्याने ओळखले. त्याने काही अधिक माहिती मला पुरवली. त्यांना दिलेल्या वेगवेगळ्या सांकेतिक शब्दांची तपशीलवार माहिती त्याने मला सांगितली. या सांकेतिक शब्दांमुळे जर्मनीत माहिती पाठवताना त्यांना आपली ओळख पटवता येणार होती. (मी ही सारी माहिती तत्परतेने आमच्या गुप्तहेरखात्याला कळवली. त्यामुळे मनात आणते तर ते जर्मन हेरखात्याला थोडेफार चकवू शकले असते. त्याच सांकेतिक शब्दांचा उपयोग करून संदेश पाठवायचे, त्यामुळे इंग्लंडच्या भूमीवर आपले हेर सुखरूप आहेत, इतकेच नव्हे तर क्रियाशील आहेत, असा विश्वास जर्मन हेरखात्याच्या मनात उत्पन्न करायचा आणि त्याबरोबर संदेश पाठवायचे ते मात्र सारे लटके, अशी हिकमत आम्हांला लढवता आली असती.)

वॉल्डबेर्ग व मायर यांची प्रकरणे निकालात काढल्यावर मी कायबूम या शेवटच्या हेराकडे वळलो. या दोघांपेक्षा तो फारच वेगळा होता. एक तर तो विशीतला तरुण होता आणि दुसरे म्हणजे तो जन्माने डच होता. आपण जर्मन हेर आहोत हे कबूल करण्याची यत्किंचित तयारी नव्हती. उलट आपण दोस्तांचे हितचिंतक हेर आहोत, असा त्याचा दावा होता. आपण त्यांचे हेर आहोत अशी जर्मनांची समजूत करून देऊन त्याने जर्मन हेरखात्याला म्हणे चकवले होते; त्यामुळे जर्मनीची अत्यंत-

गुप्त रहस्येदेखील त्याला अवगत झाली होती; त्यानंतर या इंग्लंडच्या मोहिमेत त्याने बुद्धयाच स्वत:ला सामील करून घेतले होते; आणि हे सारे करताना त्याच्या मनात एकच विचार म्हणे होता. आणि तो हा की त्याच्याजवळ असलेली सारी अमोल गुप्त माहिती दोस्तांच्या हाती पडावी आणि त्यांनी जर्मनीला धडा शिकवावा! "साहेब, मी डच मनुष्य आहे." आपल्या कहाणीचा उपसंहार करताना कायबूम म्हणाला, "ज्या डुकरांनी माझ्या मायभूमीवर निर्लज्ज आक्रमण केलं त्यांना मी मदत करीन असं वाटतं तरी कसं तुम्हांला ?"

दुरंगी हेराची खरी निष्ठा शोधून काढणे हे हेरसंशोधनातील बहुधा सर्वांत बिकट काम असावे. युद्धकाळात खरोखर अनक सच्चा देशभक्तांनी शत्रूला मदत करत असल्याचा देखावा करून त्याला चकवले होते, आणि योग्य संधी प्राप्त होताच आपली खरी निष्ठा उघड केली होती. जर्मनप्रेमी म्हणून खुद्द जर्मन हेरखात्यालाच आपलेसे करून त्यांच्या हेरशाळेत शिक्षण घेण्यापर्यंत त्यांना चकवायचे यासाठी फार महान धैर्य आणि हिकमतीची गरज होती. दुसऱ्या बाजूला, सापळ्यात अडकलेल्या एकनिष्ठ हेराला सुटण्याची धडपड करताना निर्वाणीचा मार्ग म्हणून आपण दुरंगी हेर आहोत, असा दावा करण्याचा मोह होतो, ही गोष्ट विचारात घेणे जरुरीचे होते. अशा प्रसंगी पकडणाऱ्यांच्याच पायाशी आपली निष्ठा प्रथमपासून वाहिलेली होती, असे हेरांकडून साहजिकच सांगितले जाते. कायबूम यातील कोठल्या प्रकारात बसतो, ते मला शोधून काढायचे होते. जो माणूस कदाचित निर्दोषी असण्याचा संभव आहे, इतकेच नव्हे तर स्वपक्षाला उपयोगी ठरण्याचा



संभव आहे त्याच्या बाबतीत युद्धाच्या सगळ्या गदारोळातदेखील घाईघाईने निर्णय घेणे क्षम्य ठरणार नव्हते.

## याची संगती कशी लावायची ?

ज्या जर्मन हेरशाळेत त्याने शिक्षण घेतले त्या शाळेची, तेथे शिकवण्यात आलेल्या वेगवेगळ्या तंत्रांची, तेथील शिक्षकांची माहिती कायबूमने मोठ्या आनंदाने सांगितली. कायबूम हा साधा नागरिक होता म्हणून वॉल्डबेर्ग आणि मायर यांच्यापेक्षा निराळ्या वर्गात त्याला दाखल केले होते. परंतु काही शिक्षक त्यांना समान होते. म्हणून त्या दोघांनी सांगितलेल्या माहितीशी कायबूमची माहिती ताडून पाहणे मला सहज शक्य झाले. त्याने माझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे अत्यंत मोकळेपणाने व तत्परतेने दिली. काही वेळेला तर प्रश्न आधीच ओळखून त्याचे सविस्तर उत्तर आपण होऊन देण्याचा उत्साहीपणा त्याने दाखवला. आणि हे सर्व करताना तो पुन्हापुन्हा आपला निर्दोषीपणा ठासून सांगत होता. तो अत्यंत तळमळीने बोलत होता; आणि तरीदेखील आपली कातडी बचावण्यासाठी तो खोटे बोलतो आहे असे, का कोणास ठाऊक, मला सारखे वाटत राहिले.

त्याच्या इतर तिघांबरोबर झालेल्या अटकेबद्दलच्या अधिकृत अहवालात कदाचित एखादा धागादोरा सापडेल असे मला वाटले. म्हणून मी तो अहवाल वाचला. पुन्हा वाचला. आणि नंतर एका साध्यासुध्या वाक्यामध्ये मी ज्याचा शोध करत होतो तो धागा सापडला. वाक्य असे होते : किनाऱ्यावर उतरल्यानंतर काही मिनिटांतच, बरोबर तीन वाजून दहा मिनिटांनी, पहिल्या तिघांना पकडण्यात आले. चवथ्या माणसाने – कायबूमने – मात्र कोठे किनाऱ्यावरच दडी मारली होती. त्याचा शोध करून त्यालादेखील अखेर पहाटेपूर्वी थोडा वेळ अटक करण्यात आली.

दुसऱ्या दिवशी कायबूमची उलटतपासणी घ्यायला सुरुवात करताना मी त्याला विचारले, " इंग्लंडच्या किनाऱ्यावर उतरल्यानंतर जर तुला समजा, अटक झाली नसती तर काय करणार होतास तू ! "

" मी सरळ जवळच्या एखाद्या पोलीस चौकीवर किंवा सैनिकी तळावर जाऊन माझी ओळख पटवली असती आणि माझ्या कार्याचा हेतूही सांगितला असता. "

" तेव्हा एकंदरीत दोस्तांना माहिती देण्याचं काम ताबडतोब करायला उत्सुक होतास तू ? "

" फक्त ' उत्सुक ' ? अहो ' अत्यंत उत्सुक ' म्हणा. "

" ठीक आहे ' अत्यंत उत्सुक ' म्हणतो. आता मी तुला असं विचारतो, किनाऱ्यावर पहिल्यांदा तुलाच अटक झाली असे नाही ? कारण तू आम्हांला मदत करायला ' अत्यंत उत्सुक ' होतास ना ? "

नाही साहेब. खरं सांगायचं तर मी सर्वांत शेवटी पकडला गेलो. "

" हे जरा चमत्कारिक वाटतं नाही ! " मी म्हटले. " म्हणजे असं पाहा की, एकीकडं तू म्हणतोस आपली ओळख पटवायला तू अत्यंत उत्सुक होतास म्हणून, आणि दुसरीकडं प्रत्यक्षात तशी संधी मिळाल्यावर मात्र दोन तास दडी मारून बसला होतास तू. याची संगती कशी लावायची सांग ! "

कायबूम थोडा चपापला; पण नंतर त्याने सहजपणे उत्तर दिलें, " खरे सांगू का साहेब, मी त्या वेळी अत्यंत घाबरलो होतो. ते सगळे बॅटरीचे झोत पाहिले, माणसांची आरडाओरड ऐकली आणि धीरच खचला माझा. म्हणून मी लपून बसलो. मला खरोखर असे वाटले की इथे हेर दिसल्याबरोबर त्याला गोळी घालतात की काय, म्हणून, खरं सांगतो, ती सगळी धामधूम संपल्यावर मी माझी ओळख पटवून देणार होतो मी. "

## व्हिक्टोरिया हॉटेल

मी त्याच्याकडे शोधक नजरेने पाहू लागलो. त्याच्या सांगण्यावर, खरे म्हणजे, माझा विश्वास बसत नव्हता. परंतु काही वेळा, माणसे, विशेषतः अगदी तरुण माणसे, भयाच्या भरात वाटेल त्या अतर्क्य, चमत्कारिक गोष्टी करतात. म्हणून पवित्रा बदलून त्याच्या आत्तापर्यंतच्या आयुष्याबद्दल त्याला प्रश्न विचारायला मी सुरुवात केली. तो कोणत्या प्रकारचा माणूस आहे, त्याचा स्वभाव, आवडीनिवडी कशा आहेत, त्याच्या भोवतालची परिस्थिती कशी होती, हे जाणून घेऊन त्याचे एक यथातथ्य चित्र उभे करायचे होते मला. वरवर पाहता त्याने हे सारे मला अत्यंत मोकळेपणाने सांगितले. त्याचे कौटुंबिक जीवन, त्याचे आईवडील शाळा यांची बरीच माहिती मिळाली मला. युद्ध सुरू होण्याआधी ॲम्स्टरडॅम येथील ' व्हिक्टोरिया हॉटेल 'मध्ये दुय्यम स्वागतसेवक होता तो आणि आपण जर्मनांचे पक्षपाती आहोत असे नाटक करून अखेर हेरखात्यात वर्णी लागेपर्यंत त्याने आपले पूर्वीचे काम चालूच ठेवले होते.

मला स्वतःला हॉलंडची कितपत माहिती आहे याची अर्थातच कायबूमला कल्पना नव्हती. उदाहरणार्थ, युद्ध सुरू होण्यापूर्वी ' व्हिक्टोरिया हॉटेल ' हे जर्मन प्रवाशांचे अत्यंत लाडके हॉटेल होते, याची मला माहिती होती. युद्ध सुरू होऊन जर्मनांनी हॉलंड पादाक्रांत केल्यावर तर ॲम्स्टरडॅममधील त्यांचे मुख्य केन्द्रकार्यालय याच हॉटेलात होते. अगदी पहिल्यापासून, कोवळ्या आणि संवेदनाक्षम वयात कायबूमचा जर्मनांशी सारखा संबंध आला असला पाहिजे. कारण एकोणिसशे तीसनंतरच्या दशकात, नाझी पक्षाशी सोयरिक साधणाऱ्या जर्मनांना परदेशी चलन प्राप्त करून परदेशप्रवास करणे फारच सुलभ झाले होते. म्हणून ' व्हिक्टोरिया हॉटेलमध्ये ज्या पाहुण्यांचे कायबूमने स्वागत केले आणि ज्यांची सर्वतोपरी सरबराई राखली ते बहुधा स्वतः कट्टर नाझी असण्याचा संभव होता.

## काटजांग

माझ्या हॉलंडच्या ज्ञानामुळे कायबूमबद्दल आणखी एक महत्त्वाची गोष्ट माझ्या लक्षात आली. या गोष्टीचा त्याच्या मानसिक घडणीवर निर्णायक परिणाम झाला असला पाहिजे असे मला वाटते. कायबूम हा, नेमक्या डच शब्दांत सांगायचे तर 'काटजांग' होता. ज्या अनेक सरकारी अधिकाऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना डच ईस्ट इंडिजमध्ये कित्येक वर्षे काढावी लागली होती त्यांनी तद्देशीय स्त्रियांशी विवाह केले होते किंवा काही वेळा विवाहाचा औपचारिकपणा बाजूला ठेवून त्यांच्या सहवासात राहिले होते. या संबंधांपासून झालेल्या संततीला 'काटजांग' असे नाव होते. युद्धापूर्वी आणि युद्धानंतरदेखील या मिश्र संततीला डच समाजाने आपल्यात सहज सामावून घेतले होते. तरीदेखील या ना त्या जमातीचा वारसा सांगणाऱ्या मिश्र विवाहोत्पन्न मुलाच्या मनात जन्मजात एक असुरक्षतेची आणि हीनगंडाची भावना असण्याची आणि त्यामुळे आपल्या विकासाच्या मार्गात अदृश्य अडथळे आहेत अशी तो स्वतःची विनाकारण समजूत करून घेण्याची शक्यता होती.

ज्याला हॉलंडची चांगली माहिती नाही त्याला कायबूम हा नखशिखान्त युरोपियन वाटला असता. मला मात्र त्याच्या ठिकाणी मिश्र संततीची सूक्ष्म परंतु निश्चित अशी वैशिष्टचे सहज दिसली. त्याच्या पापण्या कळेल न कळेल अशा काहीशा वर वळलेल्या होत्या. सर्वसाधारण युरोपियन माणसापेक्षा त्याचा वर्णदेखील किंचित वेगळा होता. आणि बहुधा हीनगंडापोटी आलेला कृत्रिम आर्जवीपणा त्याच्या वागण्यात होता. या खुणांवरून जर मीसुद्धा काही निष्कर्ष काढू शकलो तर ज्या बहुसंख्य डच लोकांच्या सहवासात तो आला होता त्यांनीही तसेच निष्कर्ष काढले असले पाहिजेत. आणि त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी की कायबूमला स्वतःला बोचक जाणीव झाली असली पाहिजे.

ज्या समाजात आपण मोकळेपणाने वावरू शकत नाही त्या समाजाबद्दल उपेक्षित माणसाच्या मनात एक सुप्त द्वेषाची भावना निर्माण होणे अधिकच शक्य होते आणि आपला ढासळणारा आत्मविश्वास सावरण्यासाठी काही उपाययोजनादेखील त्याने केली असती. परिणामतः जर्मन नॅशनल सोशॅलिस्ट पक्षाचा डच अवतार जी बंड (Bund) चळवळ, त्या चळवळीत कायबूमने स्वतःला झोकून देणे शक्य होते. ज्या लोकांनी शुद्ध आर्यन रक्ताचे एवढे स्तोम माजवले होते त्या जातीशी एका मिश्र संततीच्या प्रतिनिधीने एकरूप होणे हे थोडे चमत्कारिकच होते. पण याहून कितीतरी अधिक चमत्कारिक गोष्टी घडत असतात. एखाद्या गुप्त पक्षाने आपला म्हणण्यामध्ये, मनी हीनगंड वागविणाऱ्या कायबूमला फार मोठे श्रेय गवसल्यासारखे वाटले असेल आणि प्रचलित प्रस्थापित व्यवस्थेची चौकट मोडून पडल्यावर अधिकाराची जागा भूषविण्याची जी शक्यता या गुप्त आणि

प्रभावी पक्षाशी एकरूप होण्यात होती तिचेदेखील फॉन दर कायबूमसारख्या काट-जांगाला आकर्षण वाटण्यासारखे होते.

दोन तीन दिवस मी त्याच्या वैयक्तिक माहितीच्या अनुरोधाने प्रश्न विचारीत होतो; परंतु तो निश्चित कोणत्या बाजूचा आहे याविषयी स्वतःचे समाधान होईल असा निःशंक निर्णय मला देता येत नव्हता. त्याने शेवटपर्यंत पुन्हा पुन्हा तीच उत्तरे दिली होती. त्यांतील काही उत्तरे अविश्वसनीय वाटतील अशी त्याने स्वतःच कबुली दिली होती; परंतु ती सर्वस्वी खरी आहेत असा धोषाही त्याने सतत चालवला होता.

मी माझ्या डावपेचात थोडा बदल करण्याचे ठरवले. तिसऱ्या दिवशीच्या उलट-तपासणीच्या अखेरीस मी त्याला हिटलरची कुचेष्टा करणारा एक विनोदी किस्सा सांगितला. तो सांगताना फॉन दर कायबूमच्या चेहऱ्याकडे मी बारकाईने पाहत होतो. एका विशिष्ट ठिकाणी, म्हणजे जेथे हिटलरची कुचेष्टा करणारा तो शेरा मी उद्गारला तेथे, त्याचे डोळे एकदम आकुंचन पावले आणि दात आवळून धरल्या-मुळे चेहरा कठोर झाला. एक क्षण अर्ध क्षणच पण हा चेहरेबदल मी निश्चित पाहिला. त्यानंतर त्याचा चेहरा पूर्ववत झाला आणि त्याबरोबरच थोडेसे अनैसर्गिक मोठे हास्य करत त्याने तो विनोद आपल्याला आवडल्याची पावती दिली, परंतु या रंगसफेतीचा आता काही उपयोग नव्हता. फॉन दर कायबूम हा मनोमन नाझी आहे, हिटलर त्याचे श्रद्धास्थान आहे, अशी माझी खात्री पटली होती. परंतु हे सिद्ध कसे करणार होतो मी ?

## नेमबाजी आणि प्रश्नोत्तरे

चवथ्या दिवशी सकाळी पुन्हा उलटतपासणी सुरू झाली आणि त्यात सगळी सकाळ खर्च झाली. जेवणासाठी आम्ही थांबलो. नंतर मी पुन्हा उलटतपासणीला सुरुवात केली. हा वेळपर्यंत त्याचे बोलणे ऐकून मी जेवढा दमलो होतो तेवढाच तोही माझ्याशी बोलून बोलून दमला असला पाहिजे. हा शिणवटा त्याच्या डोळयां-भोवती आता स्पष्ट दिसायला लागला होता. आता तो बसल्या बसल्या अस्वस्थ झाला होता. पुन्हा पुन्हा विचारल्या जाणाऱ्या त्याच त्या प्रश्नांना चिडून उत्तरे द्यायला लागला होता.

आम्ही चहापानासाठी आणखी थोडा वेळ थांबलो. तेव्हा कायबूमला माझ्या कार्यालयातच बसवून ठेवून त्याच्यावर पहारा ठेवण्याची व्यवस्था मी केली होती. मी परत आलो तेव्हा माझ्या हातात नेमबाजीच्या खेळातील काही छोटे बाण होते. नेमबाजी हा इंग्लिश लोकांचा अत्यंत लाडका खेळ आहे आणि संध्याकाळी काही अधिकाऱ्यांविरुद्ध नेमबाजीच्या स्पर्धेत थोडासा सराव करण्याचा माझा विचार आहे, असे मी कायबूमला सांगितले. अर्थात त्याने उलटतपासणीच्या कामात व्यत्यय येण्याचे कारण नाही, असाही खुलासा मी केला. मग एका कागदाच्या पाकिटातून

हिटलरचा एक गुळगुळीत फोटो मी काढला. फोटोतील हिटलर आपल्या खास नाझी पद्धतीने उद्दाम सलाम ठोकत होता. फॉन दर कायबूमच्या नजरेत भरेल अशा रीतीने तो फोटो मी भिंतीला टाचला. नंतर पावले मोजून त्या फोटोपासून एक विशिष्ट अंतरावर मी उभा राहिलो. कायबूमकडे मी अर्धवट पाठ फिरवली.

"आता बघ" मी कायबूमकड न पाहताच, पण त्याला उद्देशून म्हटले, "हा नेमबाजीचा खेळ मला कितपत जमतो ते पाहू आपण. पण गुण कसे काय मोजायचे? मला वाटतं असं करू. बाण फोटोला नुसता लागल्यास एक गुण, हिटलरच्या शरीरात घुसला तर दोन गुण आणि मस्तकात शिरला तर तीन गुण. गुणांची ही योजना कशी काय वाटते तुला ? हा माझा सराव आणि आपली प्रश्नोत्तरं एकदमच चालू ठेवू शकू आपण. बघ हा. मी पहिला प्रश्न विचारतो : तुझं वय किती आहे म्हणालास तू ?" त्याने उत्तर देण्याआधीच बाण फेकला मी. तो फोटोजवळच भिंतीत जाऊन बसला. मी नेहमीचेच प्रश्न विचारत राहिलो; आणि प्रत्येक प्रश्न संपताना एक एक बाण फेकत राहिलो. त्याचबरोबर नेमबाजीतील माझ्या कौशल्याबद्दल कायबूमच्या कानांवर पडेल इतपत मोठ्याने मी स्वतःशीच धावते निवेदन करत होतो. उदाहरणार्थ, 'पाहा, या खेपेला चांगला लागला हं नेम' किंवा 'वा, बाण कसा अगदी हिटलरच्या रुंद थोबाडात अचूक बसला.'

फॉन दर कायबूमने हा ताण फार तर दहा मिनिटे सहन केला असेल. नंतर मात्र माझ्या अपेक्षेप्रमाणे तो मोडून पडला. खुर्चीमधून उठून तो मोठ्याने ओरडला, "हे बंद करा एकदम. मी सांगतो, हे बंद करा तुम्ही. फ्यूररचा असा अपमान करायची हिंमत तरी कशी होते तुम्हांला ? थोडे थांबा. विजयी होऊन फ्यूरर लंडनमध्ये प्रवेश करीपर्यंत थांबाच तुम्ही, मग दयेसाठी तुम्हीच त्याच्या पायांवर लोळण घ्याल." फॉन दर कायबूम बेभानपणे ओरडत सुटला. त्याच्या मुठी वळलेल्या होत्या आणि हात निर्जीवपणे वेडेवाकडे हालत होते. मी शांतपणे म्हटले, "हिटलर लंडनला येईल तोवर थांबायचं म्हणजे पुष्कळच थांबावं लागेल मला. आणि काही झालं तरी तुझ्या फ्यूररचं स्वागत करायला तू नसशील तेव्हा इथं."

## हिटलरची व्यक्तिपूजा

सेंट्रल क्रिमिनल कोर्टामध्ये, १९४० सालच्या नोव्हेंबर महिन्यात, वॉल्डबेर्ग, मायर आणि फॉन दर कायबूम यांच्यावर खटले भरण्यात आले. खटल्याच्या वेळी, कायबूमने स्वतःचा जीव वाचवण्याचा पुष्कळच प्रयत्न केला. आपण योग्य मार्गदर्शनाच्या अभावी भरकटत गेलो आणि माफी देऊन सुटका केल्यास जर्मनीविरुद्ध दोस्तांच्या बाजूने लढण्याची आपली तयारी आहे, असे त्याने सांगितले. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. हेरगिरीचा त्याच्यावरील आरोप सिद्ध होऊन त्याला देहांताची सजा फर्माविण्यात आली.

वॉल्डबर्ग आणि मायर दहा डिसेंबर रोजी फासावर चढले. फॉन दर कायबूमने



**बाण फोटोला लागला तर एक गुण, शरीरात घुसला तर दोन, आणि...**

निकालाविरुद्ध अपील केले होते. या अपिलाचा विचार झाला; परंतु त्यात शिक्षा कायमच होऊन सतरा डिसेंबर रोजी ती अंमलातही आली.

फॉन दर कायबूम खरोखरच एक अत्यंत निष्ठावंत नाझी होता. फाशीच्या आदल्या दिवशी, जेव्हा कसलीही आशा उरली नाही तेव्हा आपल्या आईला त्याने पत्र लिहिले. त्या पत्रात, आपल्या निधनामुळे तिला होणाऱ्या दुःखाबद्दल आणि क्लेशाबद्दल क्षमा मागितल्यावर त्यान पुढे लिहिले होते : "आई, तुला हे सारं समजणार याचंच दुःख होतं मला. एरवी आपला फ्यूरर आणि त्याचं महान ध्येय यांसाठी प्राणांची कुरवंडी करण्याची संधी लाभल्यामुळं मला अत्यंत धन्यता आणि संतोष वाटतो आहे." त्याचबरोबर त्याने आपले मृत्युपत्र तयार केले होते. आपल्याजवळच्या साऱ्या मौल्यवान वस्तू विकून ते पैसे जर्मन रेडक्रॉसला द्यावेत अशी सूचना त्यात त्याने आपल्या आईला केली होती.

अॅडॉल्फ हिटलरची एवढी व्यक्तिपूजा जर कायबूमने केली नसती तर आपला जीव गमावण्याची पाळी त्याच्यावर आली नसती.

○

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे । । । । । । । । । । । । । । ।

बेचाळीस रुपये । । । । । । । । । । । । । । ।

राजहंस प्रकाशन । । । । । । । । । । । । ।

# एक

# आई स्वप्नात रंगली

हा एक फारशी विशेष चमक नसलेला, पण बऱ्यापैकी कवितासंग्रह आहे. श्री. सोपानदेव चौधरी यांची अकारण पाल्हाळ लावणारी प्रस्तावना (पुरस्कार) त्याला लाभलेली आहे. 'रसात्मकम् वाक्यम् काव्यम्' या काव्याच्या व्याख्येपासून सुरुवात करून, नवकवितेतील क्षुद्र विषय, निरर्थकता वगैरे गोष्टींची चर्चा करून त्या पार्श्वभूमीवर त्यांनी कवयित्रीचे कौतुक केले आहे. सोपानदेवांच्या सहृदयते(!)चा हा परिपाक आहे.

एकंदर छत्तीस कविता या पुस्तकात आहेत. त्यांतल्या बहुसंख्य कविता सामान्य आहेत. 'बसा तुम्ही हो आतच लपुनी' यासारखी सामान्य रचना सर्वत्र आढळते. कवयित्रीच्या मर्यादित भावविश्वातल्या ठराविक अनुभूती स्वतःच्या मर्यादित कुवतीनुसार तिने ठरीवपणाने मांडलेल्या आहेत. पादपूरणार्थ शब्द योजण्याची प्राथमिक पायरीसुद्धा बऱ्याच ठिकाणी ओलांडलेली नाही.

"बाळा! माझ्या माहेरात
मला बालपण येते"

यासारखे सहजरम्य उद्‌गार कुठेकुठे आढळतात, पण ते अपवादादाखल. कवयित्रीमध्ये प्रतिभेची थोडीशी चमक आहे असे दाखविण्यापुरतेच. बाकी शब्दांना जिव्हाळा नाही, सौंदर्य नाही, मनाचा वेध घेईल असे काही नाही. या 'रचलेल्या' कविता आहेत, 'झालेल्या' नाहीत हे सर्वत्र जाणवते.

'चिन्ह मानाचे तू जाण' यासारख्या कवितेमधील विषय काव्यानुकूल असला तरी तो केवळ परंपरेने सुचलेला आहे, त्याला सहानुभवाचा ओलावा नाही हे चटकन जाणवते. त्यातील कल्पना मात्र हृद्य आहे. 'हर्ष बाळाच्या भेटीचा' यातील कल्पनाही मनोरंजक आहेत. पृथ्वी ही आई, तिचा चिमुकला बाळराजा खेळण्याच्या नादात उंच उंच गेला आणि पुन्हा पावसाच्या रूपाने आईला भेटण्यासाठी परत आला ही कल्पना. पण त्याची पद्यात रचना करताना सारेच पातळ व पसरट झाले आहे. निसर्गाशी सुसंवाद साधण्याचा कवयित्रीने बऱ्याच कवितांतून प्रयत्न केला आहे. पण सगळीकडेच तो सामान्य व सांकेतिक स्वरूपाचा असल्याने कविता चौकटीत बंदिस्त होऊन गुदमरून गेली आहे.

त्या मानाने कौटुंबिक वातावरणाच्या कविता जरा बऱ्या आहेत. पण तेथेही 'ओवाळणी !'सारख्या कवितेत पहिल्या पहिल्यांदा निर्व्याज कौटुंबिक वातावरण निर्माण झाले, तरी पुढे जादा काव्यात्मता आणण्याच्या भरात कविता सामान्य झालेली आहे. दोघींच्या आसवांचा हार करून त्यात मध्यभागी दादाच्या अश्रूंचे पदक गुंफणे हे सर्व रूपक म्हणजे प्रयत्नघटिताचा अजब प्रकार आहे. काव्य कसे फुलासारखे आपोआप उमलत जायला पाहिजे, त्याच्या धुंद परिमलाची वलये ओळीओळींतून विस्तारत जायला पाहिजेत. इथे तसे काही जाणवत नाही. कविता रचण्याचा कवयित्रीचा उत्साह तेवढा सगळीकडे दिसतो.

या सगळ्या कोंडीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न जेव्हा कवयित्रीची प्रतिमा करते तेव्हा अपरिहार्यपणे तिला केशवसुती साचा गवसतो. 'पिसेच जडले त्या विहगाचे ?' यासारखी कविता त्या साच्यात बसते. सहज हिंडताना घन वृक्षांच्या छायेत मनोहर पीस गवसणे आणि त्यामुळे अप्राप्य सुंदर खगाचा ध्यास लागून राहणे या सगळ्यावर केशवसुती छाप पडलेली असते. पण पुढच्या स्पष्टीकरणात्मकतेमुळे प्रतीकाला प्रतिभेचे सामर्थ्य येत नाही. ते नुसतेच कौतुकास्पद अनुकरणाच्या पायरीवर राहते.

'शर पितयाचा अचूक निरंतर' यासारख्या बाल कवितांचाही (बालिश कवितांचा) समावेश या पुस्तकात आहेच. सतार, शरद्पूर्णिमा आणि मयूर नर्तन या झिजलेल्या प्रतिमा झिजलेल्याच पद्धतीने कवयित्रीने वारंवार वापरलेल्या आहेत. कवयित्रीची प्रतिमासृष्टी समृद्ध तर नाहीच, पण स्वाभाविकही नाही. 'अमर स्वाक्षरी त्याची होई !' या कवितेत वीर सावरकरांच्या शपथविधीचे वर्णन रूक्ष, खडबडीत आणि वृत्तांतात्मक भाषेत केलेले आहे. कुंटयांच्या 'राजा शिवाजी'ची आठवण करून देणारे. पण अर्वाचीन मराठी कवितेच्या बाल्यावस्थेतल्या कुंटयांच्या शिवचरित्रात हे ठीक होते. तेथे कवितेचा सामान्यपणा दाखविणे हेच कार्य ती करते. 'कृष्ण 'कृष्ण' का बनला' या कवितेतील कल्पना मात्र चांगली आहे. परंतु ती अन्यत्र आलेली आहे.

चार कविता मला खरोखरच आवडल्या. याचे कारण म्हणजे एक रम्य भावमय स्त्रीत्व त्यांच्यामध्ये उमटलेले आहे. या चारही कविता खास स्त्रीच्या अनुभूती दाखवणाऱ्या आहेत. 'सखि ! म्हणशिल तर गे !', 'वीज भेटली मेघाला !', 'यशोधरेचे मनोगत !' आणि 'क्षणात कुब्जा सरला बनली !' या त्या चार कविता. गोड शैली आणि स्त्रीसुलभ भाववृत्ती हे त्यांचे वैशिष्टय. कवयित्रीच्या प्रतिभेची धारणा आणि घाट जाणवतो तो या चार कवितांतून. इतरत्र कोठेही भावनांचा उद्रेक नाही. कवयित्री थिटी पडते आहे. टाचा उंचावून कवितेला हातात पकडण्याचा प्रयत्न करते आहे, हा प्रयत्न कौतुकास्पद आहे, कुठे लोभसवाणाही आहे, पण इतकेच.

# दोन

# बलिदान

'Death Trap' या एकांकिकेवरून लेखकाला 'बलिदान' ची कल्पना सुचली. प्रस्तावनेत लेखक म्हणतात, "चिनी आक्रमणाने इ. स. १९६२ साली तत्त्वनिष्ठ नहरूंचा, शांततावादी रूढींना चिकटून राहणाऱ्या नेहरूंचा भौतिक पराभव केला. त्यामुळे निर्माण झालेल्या मानसिक संघर्षामुळे पं. जवाहरलाल नेहरूंची जीवेच्छा क्षीण झाली... मृत्यूने त्यांना अशा कोंडीत पकडले, की तेथून निसटणे अशक्य व्हावे. पण चिनी विश्वासघाताने गलितधैर्य झाले नाहीत ते पंतप्रधान नेहरू!... मरता मरता त्यांनी शत्रूला मारले." अशा तऱ्हेने तत्त्वनिष्ठ नेहरू आणि पंतप्रधान नेहरू असे नेहरूंचे दोन प्रकार कल्पून त्यांच्यांतल्या आंतरिक संघर्षाची, जयापजयाची आणि हौतात्म्याची कहाणी शिवपूरच्या राजाच्या बलिदानाच्या रूपककथेतून लेखकाने सांगितलेली आहे. मुळात याचा पायाच विसंगत आहे. पंडित नेहरूंची जीवेच्छा क्षीण होणे आणि मरता मरता त्यांनी चीनला मारणे या कल्पनेत मनोविश्लेषणात्मक, कल्पनाधिष्ठित आणि ऐतिहासिक अशा तिन्ही दृष्टिकोणांचा एकत्र गोंधळ झालेला आहे. मरता मरता नेहरूंनी शत्रूला मारले, म्हणजे नेमके काय केले? नेहरूंविषयी पूज्य, उदात्त भावना आणि वास्तवात तिला बसलेला प्रचंड धक्का यांत समजूतदार तडतोड करण्याचा हा केविलवाणा प्रयत्न आहे.

रूपकात्मक एकांकिकेचे कथानक, व्यक्तिदर्शन आणि संवाद यात एक सवंग सोपेपणा आहे. शालेय रंगभूमीवर खपण्यासारखी ही नाटिका एका विशिष्ट प्रेरणेतून लेखकाने लिहिली म्हणून तिच्याबद्दल अपेक्षाभंग होतो. अन्यथा स्त्रीपात्रविरहित ही नाटिका शालेय रंगभूमीवर चांगली वठेल असे प्रशस्तिपत्र त्याची रचना, बांधणी व लेखन पाहून द्यावेसे वाटते.

**—निशिकांत मिरजकर**

['आई स्वप्नात रंगली –' सौ. सुलोचना घोटीकर – युवा प्रकाशन संस्था. मूल्य : तीन रुपये –]

['बलिदान'– प्र. ग. बापट– श्री. गणेश प्रकाशन – मूल्य रु. १·२० –]

# भिंतीच्या ढेंबड्या

सुधाकर राजे

## □ मोहेंजो-दारु

काय साहेब, गलासभर अजंता घेणार का ? की एलोराचा पेग चालेल ? नाही लक्षात आले ? अगदीच बुवा तुम्ही सोवळे ! अहो, महाराष्ट्र सरकारने अहमदनगरला चालविलेल्या दारूच्या पिठयात–चुकलो, कारखान्यात–तयार झालेल्या रम् आणि जिन्‌ला अनुक्रमे 'अजंता' आणि 'एलोरा' अशी काव्यमय नावे देण्यात आली आहेत. आता बोला, आहे की नाही आर्यमदिरा मंडळाची ऐशी तैशी ? अजंता आणि एलोरा पाहून भान हरपते, पण अजंता आणि एलोरा पिऊन शुद्धच हरपेल. पण काही हरकत नाही, झिंगामध्येच असेल तर भारताच्या प्राचीन संस्कृतीचे आकंठ पान करून–म्हणजेच अजंता-एलोरा नामक रम् आणि जिन् झोकून–झिंगणे कुठल्याही राष्ट्रीय महाराष्ट्रीयाला अभिमानास्पद ठरेल, नाही का ? पण काही कडक कोठयाचे दर्दी म्हणायचे, आम्हांला अजंता, रम् अन् एलोरा जिन् नको–एलेफंटा व्हिस्की पाहिजे. तेव्हा सरकारी ब्रह्मांनंदी जनतेची टाळी लावणाऱ्या प्रत्येक धंद्याला कोठले नाव शोभेल हे ठरविण्यासाठी महाराष्ट्रसरकारने तज्ज्ञ तळीरामांचे एक मंडळच नेमावे. मला वाटते, भारत सरकारने एखादी पब्लिक सेक्टर हातभट्टी चालवली तर (अशी) नावे ठेवायला खूपच वाव आहे. उदाहरणार्थ, ट्रिपल-क्राऊन ब्रँडीला कन्याकुमारीआसव, दहा परसेंट बियरला मोहेंजो-दारू, तर मिनिटांत आऊट करणाऱ्या बेवडयाला ताज एक्स्प्रेस.

## □ पाण्यापासून दूध काढण्याची किमया

अमेरिकन शास्त्रज्ञांनी म्हणे लाकडाच्या भुशापासून साखर कशी तयार करावी याचा शोध लावला आहे. हत्तिच्या, हा काय शोध झाला ? आमच्या हिंदुस्थानातल्या व्यापाऱ्यांनी शास्त्रज्ञ नसतानाही याच्यापेक्षा अधिक आश्चर्यकारक शोध लावले आहेत. उदाहरणार्थ, पाण्याचे दूध कसे करावे, गारांची साखर कशी करावी, अन् लाल मातीचा मसाला कसा करावा हे आम्हा भारतीयांनी लावलेले शोध कोठल्या अमेरिकन शास्त्रज्ञाला लावता आले असते ? मागे दिल्लीला असल्या शोधांचे एक प्रदर्शनच भरले होते. ते पाहायला हे पोरसवदा अमेरिकन शास्त्रज्ञ आले असते तर हिंदुस्थानी दुकानदाररूपी मानवाने निसर्गावर कशी मात केली आहे हे पाहून त्यांनी

तोंडात बोट घातले असते. इतके असूनही आम्ही भारतीय निगर्वी आहोत व दुसऱ्यापासून (असले काही) शिकण्याची आमची नेहमीच तयारी असते. तेव्हा आता लाकडाच्या भुशाची साखर काढण्याचा प्रयोग आम्ही लवकरच करून पाहू हे कोठल्याही सुज्ञ रेशनकार्डधारिणी गृहिणीस सांगणे नलगे. आता या प्रयोगात एक-दोन अडचणी आहेत खऱ्या. त्यातली पहिली म्हणजे लाकडाचा भुसा दिसायलाही साखरेसारखा नसतो व चवीसही साखरेसारखा नसतो. परंतु आजच्या रेशन युगात जेवायला बसलेला कोठला माणूस आपण नक्की काय खात आहोत हे छातीवर हात ठेवून सांगू शकेल ? तेव्हा या अडचणीत फारसा दम नाही, दुसरी अडचण म्हणजे साखर काढण्यासाठी लाकडाचा भुसा वापरल्यावर पांढऱ्या वाळूचे काय करायचे ? पण ही अडचणही तशी क्षुल्लकच आहे; कारण पांढऱ्या वाळूचा भरपूर पुरवठा असेल तर तांदळाची नवीन व्हरायटी काढायला किती उशीर ?

तेव्हा सांगायचे काय, या अमेरिकन तथाकथित शास्त्रज्ञांनी आपल्या टिनपॉट शोधाचा उदोउदो न करता आमच्याकडूनच बरेचसे शिकावे. उदाहरणार्थ, अमेरिकनांना म्हणे आइस्क्रीम फार आवडते, पण टिपकागदाचे आइस्क्रीम करण्याची अस्सल भारतीय किमया त्यांना माहीत आहे काय ? निश्चितच नसणार ! दुधाचे आइस्क्रीम करतात अशा वेडपट अन् पुराणकालीन कल्पना अजूनही उराशी बाळगणाऱ्या या मंडळींना माझे असे कळकळीचे सांगणे आहे की, बाबांनो, जग फार पुढे गेले आहे—विशेषत: भारत तर भलताच ! इकडे आम्ही पाण्याचे पेनिसिलिन करीत असताना तिकडे तुम्ही पुठ्ठ्याचे फॅन्सी लेदरदेखील करू शकत नाही ? काय म्हणावे तुमच्या कल्पना-दारिद्र्याला ?

## ☐ बाबा आदमची पँट

अमेरिकेतील एका विश्वविद्यालयाच्या विद्यार्थिनींना पुरुषी विजारी घालून वर्गात बसण्याची परवानगी देण्यात आली आहे, याचा निषेध म्हणून काही विद्यार्थ्यांनी झगे घालून वर्गात बसायला सुरुवात केल्याचे वाचले तेव्हा एक जरा चावट चुटका आठवला : आदम आणि ईव्हच्या चित्रासमोर दोन लहान मुले उभी असतात, बराच वेळ निरखून पाहिल्यानंतर एक मुलगा दुसऱ्याला विचारतो, " यातला आदम कुठला अन् ईव्ह कुठली ? " दुसरा उत्तर देतो, " ते कसं कळणार वेड्या ? त्यांनी कपडे कुठे घातले आहेत ? " बरोबर आहे—पण बाबा आदमच्या काळी कपडेच नसल्याने खिस्तकृपेने त्याला असा निषेध प्रकट करावा लागला नाही. प्रस्तुत बहादूर विद्यार्थ्यांनी मात्र हा निषेधाचा लढा एवढ्यावर थांबवू नये, " तुर्कीका जवाब तुर्कीमें " या चिमाजी-महाराजांच्या चालीवर त्यांनी ज्याप्रमाणे विजारीचा जवाब झग्याने दिला त्याचप्रमाणे लिप्स्टिकचा जवाब रूजने अन् फेस-पावडरचा जवाब नेलपेंटने दिला पाहिजे. ○

लेखक :
**ब्रिगेडिअर जे. पी. दळवी**

अनुवाद :
**ॲडव्होकेट माधव कानिटकर**

मार्च १९६२ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष श्री. केनेडी यांचा खास प्रतिनिधी या नात्याने श्री. चेस्टर बौल्स यांनी जनरल कौल यांची भेट घेतली होती. त्या वेळी जनरल कौल CGS (Chief of the General Staff) या हुद्यावर होते. आपल्या या भेटीत श्री. चेस्टर बौल्स यांनी जनरल कौलना विचारले होते की, " भारत–चीन सीमातंटयात चीनपासून भारताला कितपत धोका आहे ? जनरल कौल ! तुमचं खरं मत मला सांगा." आणि त्यावर जनरल कौलनी त्यांना उत्तर दिले होते, " सुरुवातीला माझी अशी समजूत होती की भारतीय हद्दीत शिरणं आणि परत जाणं या मागे चिन्यांचा फक्त राजकीय हेतू असावा. पण नुकताच लडाखमध्ये चिन्यांनी जो प्रकार केला तो पाहिल्यावर मात्र अशी खात्री पटते, की भारताच्या भूमीवर हक्क सांगण्याचा त्याचा निश्चित हेतू असावा आणि त्यासाठी प्रसंगी ते शस्त्रबळाच्या जोरावर तो प्रश्न सोडवतील." श्री. चेस्टर बौल्स यांच्या दुसऱ्या एका प्रश्नाला उत्तर देताना जनरल कौल म्हणाले होते, " बहुधा १९६२ च्या हिवाळ्यात चिनी भारताबरोबर गडबड करतील आणि त्यामुळेच सध्या आमच्यापुढे असंख्य प्रश्न उपस्थित झाले आहेत."


श्री. चेस्टर बौल्स आणि कौल यांची ही मुलाखत काल्पनिक नव्हे. खुद्द जनरल कौल यांनीच त्यांच्या पुस्तकात ह्या संवादाचा उल्लेख केला आहे. आणि म्हणूनच जनरल कौल यांची ही भेट आणि मते यांबद्दल आपल्याला शंका यायला जागा नाही. ती भेट आणि त्यांची ती मते विश्वसनीय मानली तर जनरल कौलच गुन्हेगार ठरतात. कारण ही भेट विश्वसनीय मानली तर खालील गंभीर प्रश्न उपस्थित होतात.

१. धोला या वादग्रस्त टापूत चौकी बांधायला जनरल कौलनी का परवानगी दिली ?

२. भारत सरकारच्या तथाकथित फॉरवर्ड पॉलिसीला त्यांनी वेळीच विरोध का केला नाही ?

३. १९६२ च्या हिवाळ्यात चीन भारतावर शस्त्र उगारील ह्याचा बरोबर अंदाज असताना नेमके त्याच वेळी जनरल कौल रजेवर का गेले ?

४. १९६२ च्या हिवाळ्यात चीन भारताबरोबर गडबड करील ही आपली भविष्यवाणी चेस्टर बौल्सना सांगण्यापेक्षा त्यांनी आघाडीवरच्या भारतीय



कमांडर्सनाच आगाऊ का सांगितली नाही ?

५. GOC 4 डिव्हिजनला जनरल कौल यांच्या मताविरुद्ध मत व्यक्त करणाऱ्या लष्करी अधिकाऱ्यांना जनरल कौलने वेळीच परिस्थितीची स्पष्ट कल्पना का दिली नाही ?

६. CGS आणि कमांडर या नात्याने लष्करी डावपेचांची योजना का आखली नाही ? आघाडीवर राखीव फौजांची जमवाजमव का केली नाही ?

घोला या ठिकाणाची वादग्रस्त पार्श्वभूमी जनरल कौलनी चांगलीच ठाऊक होती. घोला हे ठिकाण काहीही करून वाचवा असा भारत सरकारचा हुकूम होता काय ? बहुधा नसावा. कारण चीन पुन्हापुन्हा धमकावीत होता की मॅकमोहन रेषा थाग-ला रिज या प्रदेशातून जाते हे आम्हांला मंजूर नाही. या बाबतीत भारत सरकारने चीनशी वाटाघाटी केल्या होत्या. थाग-ला—घोला प्रदेश आता वादग्रस्त टापू झाला होता. आणि म्हणूनच " जी ठिकाणं आपली आहेत अशी आपली खात्री आहे त्याच ठिकाणी आघाडीवर जाऊन चौक्या बांधा ! " असा पंतप्रधान पंडित नेहरूंचा सक्त हुकूम होता. अशा परिस्थितीत घोला या स्फोटक परिस्थिती निर्माण करू शकणाऱ्या ठिकाणी चौकी उभारण्याच्या चुकीच्या निर्णयाची जबाबदारी पंत-प्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंवर व आणखी कुणावर तरी पडते. दुसरा प्रश्न असा उपस्थित होतो की, मॅकमोहन रेषा थाग-ला रिज प्रदेशातूनच जाते हा प्रश्न भारत सरकार खरोखरीच प्रतिष्ठेचा मानीत होते का ? तसे असेल तर त्या बाबतीत भारतीय लष्कराला काही निश्चित सूचना भारत सरकारने का दिल्या नव्हत्या ? हे प्रश्न उपस्थित करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण घोला या ठिकाणी

१०

वादग्रस्त टापूत भारताची चौकी पाहिल्याबरोबर चिन्यांच्या अंगाची आग झाली आणि त्याचमुळे ६२ च्या युद्धाची ठिणगी पडली. लोकनियुक्त प्रतिनिधी श्रेष्ठ की, लष्करी अधिकारी श्रेष्ठ ? या विषयावर वाष्कळ भाषण ठोकून आणि नुसतेच शब्दांचे अवडंबर माजवून भारत सरकारला या प्रश्नांची उत्तरे फार काळ दडवता येणार नाहीत.

एक गोष्ट जगजाहीर आहे की, जनरल उमरावसिंगसकट भारतीय लष्करातले अनेक जनरल्स भारत सरकारला सांगत होते की, तारतम्य न वापरता आणि ताकद नसताना सरहद्दीवर भराभर चौक्या बांधीत सुटू नका. कारण आपल्या हद्दीत चौकी बांधणे वेगळे आणि वादग्रस्त टापूत चौकी बांधणे वेगळे. अशा परिस्थितीत कुणी हुकूम दिला जनरल उमरावसिंगला की धोला या वादग्रस्त टापूत चौकी बांध म्हणून ? भारत सरकार प्राचीन नकाशांवर अवलंबून होते ना ? मग चीनशी वाटाघाटीच करायला नको होत्या म्हणजे धोला वादग्रस्त टापूत गेले नसते. अविचाराने पुढे गेल्यामुळेच ६२ मध्ये आपला देश संकटात लोटला गेला.

जून १९६२ मध्ये कॅप्टन महावीरप्रसाद याने पुढे जाऊन धोला या ठिकाणी चौकी उभारली. कॅप्टन महावीरप्रसाद हा मूळचा १ सिख तुकडीचा. पण धोला या ठिकाणी चौकी उभारण्यासाठी आसाम रायफल्समध्ये त्याला तात्पुरता आणला गेला होता. ही चौकी उभारल्यानंतर या चौकीची देखभाल करायची होती आसाम रायफल्स या तुकडीच्या एका ज्यूनियर कमिशंड ऑफीसरने. धोला या ठिकाणाची जुजबी माहिती मी स्वतःच कॅप्टन महावीरप्रसादला दिली आणि त्या ठिकाणची अधिक सविस्तर माहिती मिळावी म्हणून मी त्याला श्री. अलुवालिया यांची भेट घ्यायला सांगितले. मला अंदाज होता की धोला या ठिकाणी आता काहीतरी चकमक होणार. आकस्मितरीत्या चिन्यांशी गाठ पडलीच तर त्यांना कसे तोंड द्यायचे हेही मी त्याला सांगून ठेवले आणि सूचना देऊन ठेवली की धोला या ठिकाणी जे काही घडेल ते मला ताबडतोब कळवीत जा. कारण आसाम रायफल्सला मदत करणे हे ७ व्या पायदळ तुकडीचे काम आहे. पण माझा हा प्रामाणिकपणा मला नडला. कारण वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांकडून मला तुसडेपणाने बजावले गेले की कॅप्टन महावीरप्रसादनी त्यांच्या नेहमीच्या वहिवाटीप्रमाणे आसाम रायफल्सलाच रिपोर्ट द्यायला पाहिजे. तुझा संबंध काय ? तुला फक्त आसाम रायफल्सला मदत करायला सांगितली आहे. त्या तुकडीवर नियंत्रण करायला नव्हे. मला दुःख झाले त्याहीपेक्षा जास्त आश्चर्य वाटले ! चिनी पुढे आलेच तर आसाम रायफल्सच्या मदतीला धावून जाणे हे माझे काम होते. मग धोला या ठिकाणी नक्की काय घडतंय ते मला कळायला नको ? आसाम रायफल्सशी ७ व्या पायदळ तुकडीचा कमांडर या नात्याने माझा संबंध नव्हता ? आपल्या देशात ॲडमिनिस्ट्रेशन हा शब्द असा धुमाकूळ घालतो.

नंतर माझ्या हेही लक्षात आले की धोला हे ठिकाण एकतर वादग्रस्त टापूत आहेच पण लष्करी दृष्टचा ती जागा म्हणजे मृत्यूचा जबडाच आहे. चिनी पुढे घुसलेच तर आपले जवान अलगद कोंडीत पकडून मारले जातील. एखाद्या ठिकाणी पाण्याची सोय आहे किंवा विमानातून टाकली जाणारी रसद सहज मिळेल अशा ठिकाणी केवळ आपल्याला सोपे जाईल म्हणून चौकी बांधायची नसते तर त्या ठिकाणी शत्रुसैन्य घुसले तर आपली काय वाट लागेल याचा विचार प्रथम करायचा असतो. लढाईमध्ये आपण काय करू शकतो यापेक्षा शत्रू काय करू शकेल याला जास्त महत्त्व आहे.

जुलै १९६२ मध्येच GOC 4 डिव्हिजन याने त्याच्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्याचे लेखी मत कळवले की "काय हा वेडेपणा? आपल्या धोला या पोस्टला काही अर्थ आहे का ? अजून वेळ गेलेली नाही. अजून विचार करा आणि ती चौकी सुरक्षित ठिकाणी हलवा." GOC 4 च्या या पत्राला २ महिने उत्तरच आले नाही. उत्तराला उशीर का झाला ? कोण अधिकारी जबाबदार आहे या दिरंगाईला ? याची चौकशी झाली पाहिजे.

धोला या ठिकाणी चौकी बांधून झाल्यावर मग मात्र त्या चौकीकडे दुर्लक्ष केले जाऊ लागले. चौकी बांधल्या ना ? बस् झाले ! फॉरवर्ड पॉलिसी अक्षरशः अमलात आणली. आपले लक्ष नसेल पण चिन्यांचे होते ना ! त्यांनीच आपल्याला जाग आणली. धोला इथे आपली चौकी पाहून कुठलीही पूर्वसूचना न देता, आकस्मिकरीत्या भारताला दम भरला की, ज्याला लढायचे आहे त्याच्या मनगटात जोर लागतो. तुमची चौकी महत्त्वाची नाही पण प्रश्न तत्त्वाचा आहे. थागला प्रदेशातून मागे हटा नाहीतर परिणाम वाईट होईल.

भारत सरकारनेदेखील फुशारकी मारली की. आमची पण तयारी आहे. होऊन जाऊ द्या ! ८ सप्टेंबर ६२ ला चिनी सैन्य पुढे घुसले आणि त्यांनी धोला या ठिकाणची आपली चौकी होतीची नव्हती करून टाकली. आघाडीवरच्या चौकीच्या मागे मिलिटरी जय्यत तयार ठेवावी लागते ती यासाठी. असे असले म्हणजे मग 'आमची तयारी उत्तम आहे !' अशी घोषणा लोकसभेत करावी लागत नाही. तयारी आहे ! असे कधी सांगायचे नसते. योग्य वेळी दाखवून द्यायचे असते. अफझुलखानाच्या पोटातली आतडी बाहेर खेचून काढीपर्यंत छत्रपतींनी त्याला कधी सांगितले नव्हते की, आमची तयारी उत्तम आहे ! त्याला योग्य वेळी ते कळले.

काहीही लष्करी तयारी नसताना धोला या ठिकाणी चौकी बांधण्याचा निर्णय घेणारी माणसे पापाची धनी आहेत. या चौकीमुळेच भारतावर आक्रमण करण्याचे निमित्त चिन्यांना सापडले......आणि ?...... आणि सगळ्या जगात भारतीय लष्कराची मान शरमेने खाली आली.

एप्रिल १९६२ मध्येच मी वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना कमांडर या नात्याने

लष्कराची हालचाल घडवून आणण्यात मला काय अडचणी आहेत याचा रिपोर्ट दिला. त्यांच्या हेही लक्षात आणून दिले की ७ व्या पायदळ तुकडीला तावांगचे संरक्षण करा आणि आसाम रायफल्सला मदत करा ह्या भारत सरकारकडून आलेल्या हुकमातच विसंगती आहे. तावांग हा प्रदेश विस्तीर्ण आहे आणि तावांगचे संरक्षण करायचे असेल तर मला माझी ब्रिगेड पांगवावी लागेल. उलट आसाम रायफल्सला मदत करायची तर माझी ब्रिगेड एकत्र करून ठेवावी लागेल. माझा हा रिपोर्ट वर पोचला होता. पण नेमकी त्याच वेळी GOC ची बदली झाली होती. त्यांनी जाता जाता मला सल्ला दिला की आता मेजर जनरल निरंजनप्रसाद माझ्या जागी GOC म्हणून आहेत त्यांच्याशीच या बाबतीत काय ते बोला.' नवीन GOC नी मला सांगितले की, 'GOC म्हणून मी आत्ताच कुठे सूत्रे हातात घेतोय. परिस्थितीचा बारकाईने अभ्यास करून मग मी तुम्हांला या बाबतीत काय ते सांगेन. तूर्त तुम्ही तुमच्या सध्याच्या योजनांचा फेरविचार करून योग्य तो हुकूम द्या.'

योजनांचा फेरविचार करतानादेखील मला अडचणी होत्याच. लढाईची वेळ, शत्रूच्या खऱ्या ताकदीचा योग्य अंदाज, चिनी पुढे आलेच तर त्यांचा रोख मुख्यत: कुठे असेल, चीनने दमदाटी सुरू केलेली आहे, माझ्या ब्रिगेडमधल्या जवानांना रजेवर जायला परवानगी देऊ का नको? याचा मला विचार करून नंतरच योजना आखायची होती. आणि तरी देखील ही योजना कदाचित कागदोपत्री ठरली असती. आर्मी हेडक्वार्टरकडे तरी काही निश्चित कार्यक्षम योजना होती की नाही याची मला शंका आहे.

एप्रिल आणि मे १९६२ हे दोन महिने आपण आणखी वेळ फुकट घालवला. ७ व्या पायदळ तुकडीची तयारी कितपत आहे याची परीक्षा घेण्यासाठी आमच्या तुकडीतल्या जवानांची तालीम घेण्याचे ठरले. काय हा मूर्खपणा! आमच्या तुकडीतल्या जवानांची हालचाल ही फक्त तालीम आहे हे चिन्यांना कळले नसते तर? तर भारतीय लष्कराच्या या हालचालीचा भलताच अर्थ करून घेऊन चिनी तावडतोब पुढे आले असते. नशीब एवढेच की हा तालीम घेण्याचा कार्यक्रम रद्द करण्यात आला...पण त्यासाठी आम्हांला रक्ताचे पाणी करावे लागले. डिव्हिजन आणि ब्रिगेड हेडक्वार्टर्स यांच्यांत कडवट आणि खवचट भाषेत पत्रव्यवहार झाला. त्या दिवसांत भारतीय सेनेत एका नवीनच प्रवृत्तीचा जन्म झाला होता. जवानांच्या तयारीची प्रात्यक्षिके करून दाखवायची! त्या वेळी आमंत्रित सन्माननीय पाहुणे आणि कुणीतरी बडा माणूस अध्यक्ष म्हणून बोलवायचा. त्यानंतर हार तुरे, भाषणे आणि जवानांचे कौतुक होऊन समारंभ संपायचा. पण या सगळ्या प्रकरणात चीनसारखा प्रबळ शत्रू पुढून आला तर आपली लष्करी तयारी कितपत आहे या महत्त्वाच्या विषयाकडे सन्माननीय अध्यक्ष दुर्लक्ष करीत असत.

जून १९६२ मध्ये पावसाळा सुरू झाला आणि खराब हवामानामुळे रसद घेऊन

येणारी विमाने परत जाऊ लागली. आधीच कमी मिळणाऱ्या अन्नात आणखी कपात करावी लागली. जवान फक्त वाटाणे आणि गाजरे खाऊन दिवस काढू लागले. फक्त मिळेल ते आणि तेवढेच खात होते.

ऑगस्ट १९६२ पर्यंत आपली धारणा हीच होती की चीन प्रत्यक्ष युद्ध करणार नाही. आणि त्या वेळी भारतीय सरहद्दीपासून अगदी थोड्या अंतरावर चीन सैन्याची प्रचंड जमवाजमव करीत होता. चिनी लष्करात बहुधा निश्चित हुकूम सुटले असले पाहिजेत की पुढच्या पंधरा दिवसांत भारतावर आक्रमण करायचे. कुठल्याही क्षणी वरून हुकूम येईल, तयार राहा ! तावांगमध्ये संरक्षणासाठी अधिक सैन्य पाठवा ही माझी सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांना मान्य झाली होती, पण चीन इतक्या लवकर......पुढच्या पंधरा दिवसांत......भारतावर आक्रमण करील असे त्यांना वाटत नव्हते. आणि तरीदेखील सरकारी हुकूमाप्रमाणे तावांगच्या संरक्षणाची जबाबदारी ७ व्या पायदळ तुकडीवर–म्हणजे मुख्यतः माझ्यावरच-होती. भारत सरकार त्या वेळी फक्त एवढेच पाहत होते की केमांग फ्रॉंटियर डिव्हिजनचा प्रत्येक कानाकोपरा कुणाच्यातरी ताब्यात देऊन त्याला सांगायचे की तू याचे संरक्षण कर ! काही झाले तरी जबाबदार तू आहेस !......पण त्याचबरोबर आपली लढाईची तयारी कितपत आहे ? त्या दृष्टीने कमांडरच्या मागण्या काय आहेत ? त्या कशा पूर्ण करायच्या इकडे सरकार लक्ष देत नव्हते. ज्या आणखी फौजा आघाडीवर पाठविल्या जात होत्या त्यांतील जवानांना तावांगच्या प्रदेशाबद्दल काहीच माहिती नव्हती. ज्या प्रदेशात जवान लढणार त्या प्रदेशाचे त्याला ज्ञान नको ? नुसत्या फौजा पाठवून लढाई होते ? कुठली तुकडी कुठे पाठवायची याच्यातदेखील सुसूत्रता नव्हती. उदाहरणार्थ पायदळ तुकडी क्रमांक ११ ही जर का प्रथमपासूनच बोम–दिला या ठिकाणी आणली गेली असती तर त्या प्रदेशात रस्ते कसे आहेत ? खाचखळगे कुठे आहेत ? कुठला रस्ता कुठे जातो ? याचा त्या तुकडीतल्या जवानांना अभ्यास करता आला असता व बोम–दिला इतक्या सहज आणि इतक्या लवकर पडले नसते. ही तुकडी मध्येच वालांगमध्ये पाठविण्यात आली होती. का ? कारण तेव्हा की भारत सरकारच्या मते चीनला युद्ध नको आहे. आपण जवान फक्त आघाडीवर पाठवायचे ! पण लढाईचे तंत्र काय म्हणते ? याचा विचारच कोणाला नव्हता.

......१९६२ पर्यंत परिस्थिती ही अशी होती !

...आतापर्यंत आपण किती आणि कसे दुबळे होतो हेच फक्त मी सांगत आलो. आता हेही सांगतो की, राजकीय आणि लष्करी दृष्टचा एकूण परिस्थिती चीनला खरोखरच कशी अनुकूल होती आणि चीनची लष्करी तयारी किती आणि कशी प्रचंड होती. कारण, त्याशिवाय भारतीय जनतेचा भारतीय लष्करावरचा राग आणि खचून गेलेली हिम्मत भरून येणार नाही. १९५० ते १९६२ या प्रदीर्घ

कालखंडात राजकीय पातळीवर चीनने भारताला कसे बनवले ते आधी पाहू. चीनने असा चावटपणा सुरू केला की एकीकडे तुम्ही आमचे मित्र आहात 'हिन्दी-चीनी भाई भाई' असे म्हणत राहत चोरटेपणाने हळूच भारतीय हद्दीत पुढे येऊन भारताची भूमी व्यापून टाकायची. भारत सरकारवर जबाबदारी येऊन पडत होती की एकतर हे अतिक्रमण न बोलता सहन करायला हवे किंवा शस्त्रबळावर चीनला अक्षरशः हुसकून काढायला हवे. म्हणजे पुढे घुसायचे चीनने आणि विचारात पडायचे ते भारत सरकारने की आता काय करू ? चीनशी असलेल्या दोस्तीचे काय करायचे ? खरे बोलावे तर भारतीय जनता खवळून उठेल आणि चीनला हुसकावायला जावे तर मग त्या 'हिन्दी चिनी भाई भाई' या घोषणेचे काय होणार ? त्यापेक्षा चिनी थोऽऽडे पुढे घुसलेत हे आपण सहन करू आणि भारतीय जनतेला अंधारात ठेवू. चीनच्या अंतिम विजयाचा हा पहिला टप्पा होता. भारत सरकार एकीकडे 'आमची तयारी उत्तम आहे' चा आभास निर्माण करीत होते तर दुसरीकडे चीनशी वाटाघाटी करीत होते. लोकनियुक्त प्रतिनिधींनी (!) त्या वेळी असे दुटप्पी धोरण अवलंबिले होते. लडाखमधली भारताची भूमी चीनने लढाईपूर्वीच व्यापून टाकली होती आणि चीन तो भू-भाग वाटाघाटी करून सोडणार नव्हते. कारण, भारत सरकारने जरी त्या प्रदेशाकडे आतापर्यंत दुर्लक्ष केले होते तरी चीनला ठाऊक होते की, हा सोन्याचा तुकडा वाटाघाटी करून सोडून देण्यासारखा नाही. त्यानंतर भारत सरकारने घोषणा केली की, 'इंच इंच लढवू !' त्यामुळे चीन सरकार जागे झाले. त्यांना वाटले कुठलेही स्थिर सरकार अशी घोषणा तयारी नसताना उगाच करणार नाही ! ...आणि लडाखमधली भारताची चोरून खाल्लेली जमीन तर आपल्याला सोडायची नाही. म्हणून १९५० पासूनच चीनने तिबेटमध्ये प्रचंड लष्करी तयारी सुरू केली. चीनजवळ सामर्थ्य होते. त्यामुळे ते चोर आणि वर शिरजोर ठरले. चीनने ठरवले होते की, भारताची लडाखमधली चोरलेली जमीन तर भारताला परत द्यायची नाहीच, उलट भावनेच्या भरात भारत सरकारने हा प्रदेश परत मिळवा, असा हुकूम भारतीय लष्कराला दिला तरच बरे होईल ! कारण, मग काही तरी निमित्त करून लढाई सुरू करता येईल. लढाईत चीनचा नक्की विजय होईल. कारण, भारताची लष्करी तयारी चीनशी टक्कर देण्याइतकी चांगली नाही. ज्यांची लढण्याची तयारी चांगली असते ते वाटाघाटी करायला कधीही उत्सुक नसतात ! लढाईत एकदा का भारतीय लष्कराला ठोकून काढले की लडाखमधील भारताची चोरलेली जमीन तर आपल्याला मिळेलच पण त्याहीपेक्षा भारतावर उघड उघड आक्रमण करून भारताची समृद्ध आणि विस्तीर्ण भूमी आपण कायमची खाऊन टाकू आणि आरडाओरडा करू की, आम्ही भारतावर आक्रमण केलेले नाही, उलट भारतानेच चीनवर हल्ला करण्यासाठी फौजा पाठवल्या होत्या. आता लढाईत चीनचा विजय झाला हा काय चीनचा-

दोष ? १९५९ मध्ये तिबेटवर यशस्वीरीत्या आक्रमण करून झाल्यानंतर चीनची नजर भारतावर फिरली ! सर्पाने जिभल्या चाटायला सुरुवात केली ! भारताच्या सरहद्दीवर अगदी लागूनच चीनने चिनी सैन्याची प्रचंड जमवाजमव केली. मोठमोठे फसवे रस्ते बांधून काढले. टेलिफोन कनेक्शन्स जोडली आणि चीनच्या या तयारीकडे भारत सरकारने काना-डोळा केला. भारत सरकारची वृत्ती अशी होती की, चोर आले असले तरी शेजारच्याच घरात आलेत, आपल्याला काय करायचे ? त्यांचे ते बघतील. तिबेटमध्ये घट्ट पाय रोवून घेण्यासाठी चीनला जो वेळ हवा होता त्या वेळेपर्यंत चीनने भारतावरोबर दोस्तीचे नाटक कायम ठेवले आणि भारतीय नेत्यांची अशी गैरसमजूत करून दिली की, चीनला युद्ध नको आहे. आणि जेव्हा का चीनने त्याचे दाखवायचे दात बंद करून खायचे दात दाखवायला सुरुवात केली आणि भारताला स्पष्टपणे सांगितले की 'लडाखमधून आम्ही मागे जाणार नाही ! आम्ही ती जमीन व्यापली. याला कारण, ती खरे म्हणजे आमचीच होती !' तेव्हा कुठे भारत सरकारचे डोळे उघडले. आणि चीनविरुद्ध आता तरी लष्करी तयारी करायला हवी याची भारत सरकारला जाणीव झाली. खवळलेल्या भारतीय जनतेला काहीही करून शांत करण्यासाठी भारत सरकारने पुढचा मागचा विचार न करता सरहद्दीवर फौजा पाठवल्या तरीदेखील भारत सरकारला अशी आशा वाटत होती की, आपण फार सुंदर भाषेत, विद्वत्ताप्रचुर, विपुल लिखाण करून चीनला खलिते लिहिले तर अजूनही भारत-चीन सीमातंटा वाटाघाटी करून सुटेल. चीनने मात्र त्याची कपटनीती त्या वेळी चालूच ठेवली होती. १९५९ मध्ये किंझमाने आणि लोंगजू या दोन ठिकाणी चिनी सैनिकांनी भारतीय जवानांना ढकलून दिले. त्यांच्यावर गोळीबार न करता चिन्यांनी त्यांना भारतीय हद्दीत आत रेटवीत आणले. चीन जगाला सांगायला मोकळा होता की, "चीनला युद्ध नकोच आहे. युद्धच करायचे असते तर भारताच्या जवानांना आम्ही काय फक्त ढकलून दिले असते ? ठार मारले असते !" १९६२ पर्यंत अशा कपटी मार्गाने खेळ खेळून चीनने युद्धाची जय्यत तयारी केली. चिनी सैनिकांच्या हातांत आता वजनाला हलकी पण माणसे मारण्याचे काम चोख बजावू शकतील अशी अद्ययावत शस्त्रास्त्रे होती. १९५९ नंतरच चीनने निर्णय घेतला असला पाहिजे की, आता भारतावर आक्रमण करायला हरकत नाही. तयारी अशी पूर्ण होऊन ताकद वाढल्यावरोबर चीन मस्तवाल भाषेत बोलू लागला. १९६२ च्या सुरुवातीलाच चीनचे पंतप्रधान श्री. चाऊ-एन्-लाय यांनी भारताला दम दिला की, 'जर का गलवान व्हॅलीच्या वादग्रस्त टापूत भारताने चौक्या उभारल्या तर चिनी सैन्याला मॅकमोहन रेषा ओलांडणे भाग पडेल !' ऑगस्ट १९६२ मध्ये लडाखमधल्या पँगाँग लेक (Pangong Lake) या विभागात चिनी सैनिक आणि भारतीय जवान यांच्यांत घुमश्चक्री झाली ! ...आणि त्यानंतर

मात्र चीनने प्रत्यक्ष आक्रमक हालचाली सुरू केल्या. चीनने वादग्रस्त टापूत ३० नव्या चौक्या उभारल्या. गस्त घालणाऱ्या चिनी सैनिकांच्या संख्येत वाढ केली. चीनने प्रत्यक्ष लढाईपूर्वीच भारताची लडाखमधली १२००० चौरस मैल जमीन व्यापून टाकली होती. लढाईनंतर पुढे घुसून चीनने भारताच्या आणखी २००० चौरस मैल जमिनीवर स्वामित्व लादले आणि एवढे करून चिनी सैन्य परत का गेले ? आणखी पुढे का आले नाही ? याचे भारत सरकारला आश्चर्य वाटले.

जुलै १९६२ मध्ये भारताने पुन्हा एकदा सीमातंटा सोडवण्यासाठी चीनला आवाहन केले. पण भारताची ही सहिष्णुता चीनने ठोकरून दिली. कारण लढाईची तयारी आता झाली होती. भारत चीनच्या या नीतीकडे दुर्लक्ष करून स्वतःचीच फसवणूक करून घेत होता. भारताच्या धोरणाची तुलना फक्त शहामृगाशीच करता आली असती. मान उंच, पळतो चांगला पण लढता मात्र येत नाही ! एखादा जुगारी डाव हरत चालला असताना अंगाला घाम फुटल्यावर जशा खोट्या आशेवर इतरांना बंडला मारतो, तसे भारत सरकार सांगत सुटले की, ' परिस्थिती अनुकूल आहे ', ' तयारी उत्तम आहे. ' त्यामुळे भारतीय जनता तात्पुरती शांत झाली.

१९६२ मध्ये चीनची दुहेरी तयारी झाली होती. चीनचे म्हणणे असे होते की, चीन मागेल तेवढी जमीन भारताने मुकाट्याने चीनला देऊन टाकली तर भारता-बरोबरच्या वाटाघाटी यशस्वी होतील. उलट भारताची अवस्था मात्र नाही धड वाटाघाटींची तयारी, नाही धड लढाईची तयारी, अशी अनुकंपनीय होती.

आणि लवकरच चीनने भारताला ६२ च्या युद्धाची पहिली सलामी दिली. ही सलामी दिली ती सुद्धा अंतरराष्ट्रीय शांततेच्या प्रयत्नात असलेल्या स्वित्झर्लंडमधल्या जिनेव्हा या ठिकाणी.

काय घडले जिनव्हा येथील परिषदेत ? [ क्रमशः ]

From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi.
Thacker& Co. © with the Original Publisher.

दत्तप्रसाद दाभोळकर


# अपोलो १०—चंद्रप्रवासाची शेवटची रंगीत तालीम

अंतराळयानांचे प्रवास फार अचूकपणे सुरू असतात. वेळेच्या बाबत सेकंदांचा आणि अंतराच्या बाबत सेंटिमीटरचा काटेकोरपणा या प्रवासात पाळला जातो. या साऱ्या प्रवासात एक गोष्ट मात्र खास 'भारतीय वेळे'प्रमाणे होते ! ती गोष्ट म्हणजे प्रत्यक्ष प्रवास सुरू होण्याची वेळ. ही वेळ अनेक कारणांनी पुन्हा पुन्हा बदलावी लागते. पण या वेळेबाबतही अमेरिकन शास्त्रज्ञ आता खूप काटकोर होऊ लागलेत. त्यामुळे या वेळी १७ मे या दिवसाची आपण उत्सुकतेने वाट पाहावयास हरकत नाही अपोलो १० च्या उड्डाणाचा दिवस म्हणून अमेरिकन शास्त्रज्ञांनी हा दिवस जाहीर केलाय.

खरे पाहता अपोलो १० च्या उड्डाणात नवे असे काही नाही. अपोलो १० ही अपोलो ९ ची सहीसही नक्कल आहे. किंबहुना ज्या वेळी १३ मार्चला अपोलो ९ सुखरूपणे परत आले. त्या दिवशी अमेरिकेच्या अंतरिक्ष कार्यक्रमाचे प्रमुख डॉ. जॉर्ज म्युल्लर यांनी अपोलो १० चे उड्डाण रद्द करून टाकले होते. त्यांच्या मते अपोलो १० ही पायरी गाळून आता सरळ अपोलो ११ चे उड्डाण करून चंद्रावर उतरावे. पण त्यानंतर काही तासांतच 'नासा'ने त्यांचे हे मत स्वीकारार्ह नसल्याचे जाहीर केले.

अपोलो ९ आणि अपोलो १० इतर अपोलोंहून खूप वेगळी आहेत. हे वेगळेपण त्यांना 'चंद्रयाना'मुळे प्राप्त झालंय. चंद्रयान आणि अपोलो यांची कामे सर्वस्वी वेगळी आहेत. परगावी जाताना आपण आगगाडीने विक्षित शहरापर्यंत जातो. मात्र स्टेशनपासून आपल्या नियोजित ठिकाणी जाण्यासाठी आपणांला टॅक्सी करावी लागते. आपल्या प्रवासात रेल्वेचे जे काम आहे ते चंद्रप्रवासात अपोलोचे आहे. आपल्या प्रवासात टॅक्सी जे काम करते ते चंद्रप्रवासात चंद्रयानाने करावयाचे आहे. अपोलोमधून चंद्राच्या जवळ गेल्यावर, चंद्रयान अपोलोमधून बाहेर पडेल. त्या चंद्रयानात बसून अंतराळवीर चंद्रावर उतरेल. त्याच यानात बसून तो पुन्हा अपोलोमध्ये प्रवेश करील.

अपोलो ९ आणि १० ही मुख्यत: चंद्रयानाच्या कार्यक्षमतेची परीक्षा घेणार आहेत. अपोलो ९ मधून प्रवासाला गेलेले मॅकडेव्हिड आणि शेकॉर्ट प्रवासाच्या पाचव्या दिवशी (म्हणजे सहा मार्चला) आपल्या मुख्य कार्याला लागले. त्या दिवशी त्यांनी





**अपोलो १०**

अपोलोपासून चंद्रयान अलग करण्याचा व अपोलोला पुन्हा जोडण्याचा प्रयोग केला. या साऱ्या कार्याला त्यांना फक्त सहा तास लागले. त्यानंतर त्यांनी चंद्रयान पुन्हा एकदा अपोलोपासून वेगळे केले व त्या चंद्रयानात बसून ११० मैल फेरफटका मारला. प्रत्यक्ष चंद्रावर उतरून परत यावयाच्या वेळीही या चंद्रयानाला एवढाच प्रवास करावा लागणार आहे. चंद्रयानातील प्रवास खूप जिकिरीचा आहे-अगदी मुंबईतील लोकलच्या प्रवासाइतका! या चंद्रयानात जेमतेम एकमेकांना खेटून उभे राहता येईल एवढीच जागा दोन अंतराळवीरांसाठी राखून ठेवलेली आहे. बाकी सारी यंत्रे, यंत्रे आणि यंत्रे! अपोलो ९च्या उड्डाणाच्या वेळी अंतराळवीरांनी चद्रयानाच्या बाहेरही फेरफटका मारला. प्रत्यक्ष चंद्रावर उतरताना त्यांच्या अंगावर जे कपडे असतील त्यांची चाचणी केली. शेकॉर्टकडे तर खूप वेळ शिडीवर उभे राहण्याचे काम होते. चंद्रप्रवासातील पोशाख अंगावर घातलेला. पाठीवर ऑक्सिजनचे नळकांडे जोडलेले आणि हातात कॅमेरा अशा थाटात तो वीर अनेक तास शिडीवर उभा होता. अपोलो ९ने येताना चंद्रयान परत आणलेले नाही. ते त्यांनी तसेच अंतराळात सोडून दिले.

आता अपोलो १० ला पुन्हा या साऱ्या कसरती कराव्या लागतील. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या वेळी चंद्रयान चंद्रापासून केवळ १० मैल अंतरावरून फेरफटका मारून येईल आणि हे सारे झाले की जूनमध्ये केव्हातरी माणूस चंद्रावर उतरेल.

# नवा चंद्र

शास्त्रज्ञ मानवाला अगदी लवकरच चंद्रावर उतरवणार. पण या साऱ्या प्रकारात शास्त्रज्ञांनी चंद्राचे सौंदर्य नको तितके उघड करून सांगितले. निंबोणीच्या झाडाखाली लपलेला तुमचा–माझा चंदामामा आता कायमचा हरवून गेलाय! कवींची आणि प्रेमवीरांची तर भलतीच पंचाईत झालीय. आता एखाद्या सुंदरीच्या चेहऱ्याला जर ते चंद्राची उपमा द्यावयास गेले, तर आपला अपमान केला म्हणून ती सुंदरी त्याच्यावर जाम भडकेल. अशा वेळी त्या चिडलेल्या चंद्रमुखीकडून अर्धचंद्र मिळण्यापलीकडे आणखी काही त्या प्रेमवीराच्या हाती लागणार नाही!

पण या साऱ्यांनाच अमेरिकन शास्त्रज्ञांनी नुकताच दिलासा दिला. एक सुंदर, आकर्षक, कोरा करकरीत चंद्र मानवाच्या सेवेला सादर करण्याचा त्यांचा मानस आहे. हा चंद्र पृथ्वीपासून २२,३०० मैलांवर विषुववृत्ताच्या रेषेत असेल. हा चंद्र पृथ्वीच्या तालावर सम गतीत भ्रमण करील. हा चंद्र कामाला लागला की, पृथ्वीवरील नगरपालिकांचे काम बरेचसे कमी होईल. कारण हा चंद्र सूर्यकिरण परावर्तित करून पृथ्वीवर पाठवील. या प्रकाशाच्यामुळे रात्रीच्या वेळी शहरे, आल्हाददायक, शांत प्रकाशात न्हाऊन निघतील. या चंद्रावर जर २००० फूट व्यासाचा आरसा बसवला असेल तर त्याच्या जोरावर निम्म्या इंग्लंडला रात्रीच्या वेळी प्रकाश पुरवता येईल. अवकाशात चालणारे अवकाशवीर हा आरसा बसविण्याचे काम करतील. या नव्या चंद्रावर योग्य त्या ठिकाणी आरसे बसवून पृथ्वीचा नेमका पाहिजे तो भूभाग प्रकाशित करता येईल. युद्धाच्या वेळी शत्रुपक्षाची शहरे रात्ररात्र उजेडात ठेवण्यासाठीही या चंद्राचा उपयोग होईल. या साऱ्या योजनेचा बारकाईने अभ्यास करण्याचे काम अमेरिकेच्या संरक्षण खात्याने आणि 'नासा' ने 'वेस्टिंग हाऊस इलेक्ट्रिक कॉर्पोरेशन' वर सोपविले आहे. लवकरच त्यांचा अहवाल बाहेर पडेल आणि त्या अहवालात जर होकार असेल,तर ७२ सालापर्यंत नवा चंद्र पृथ्वीभोवती रुंजी घालू लागेल.

# भारतातील विज्ञानवार्ता

होय! या वार्ता तशा फारच मामुली वाटतात. चंद्रावर उतरणे, नवा चंद्र निर्माण करणे असल्या सनसनाटी बातम्यांपुढे आपण या बातम्या छापतसुद्धा नाही!

पण खरे बोलायचे तर हे भीमपराक्रम आहेत. भारतात उपलब्ध साधनसामग्रीवर केलेले. भारताला अतिशय उपयोगी पडेल असे हे संशोधन आहे. भारतातील विज्ञान मंदिरातून गेल्या महिन्यात कानांवर आलेल्या या दोन बातम्या निःसंशय गौरवास्पद आहेत.

पहिली बातमी आहे म्हैसूरमधली. म्हैसूरमधल्या केंद्रीय अन्नसंशोधन विभागातील डॉ. जोसेफ टॉमस आणि डॉ. प्रेमलता टॉमस या संशोधकांनी एक नवा संश्लेषी हारमोन शोधून काढलाय. उत्तर प्रदेशात नींबू गवत (Lemon grass) म्हणून एक वनस्पती विपुल स्वरूपात मिळते. या वनस्पतीच्या अर्कापासून त्यांनी हा नवा रासायनिक पदार्थ बनविला आहे. हे रसायन अत्यंत जालीम स्वरूपाचे कीटकनाशक म्हणून उपयोगी पडेल. त्यातून कोणत्याही झाडावर, फळावर वा धान्यावर या कीटकनाशकाचे काही दुष्परिणाम होणार नाहीत. कारण या कीटकनाशकात तसे कोणतेच विष नाही. फक्त या कीटकनाशकांमुळे कीटकांचे ' कुटुंब-नियोजन ' होते. या हारमोनच्या सान्निध्यात आले की कीटकांची जननशक्ती नाहीशी होते. या कीटकनाशकाचा योग्य वापर केला तर धान्य खूप दिवस सुस्थितीत साठवता येईल, असा त्या संशोधकांचा दावा आहे.

दुसरी बातमी डेहराडूनच्या ' भारतीय पेट्रोल संशोधन विभागा 'तील आहे. उंच डोंगरावर, विशेषतः नेफा आघाडीवर, काही यंत्रे चालू करणे खूप कठीण जाते. जी यंत्रे ठिणगी उडवून कार्यान्वित केली जातात ती यंत्रे या प्रकारात मोडतात. उंच प्रदेशात विरळ झालेली हवा आणि हवेचा कमी झालेला दाब हे यामागचे कारण असते. डेहराडूनच्या संशोधकांनी शोधून काढलेले ' इंधन वायुमिश्रण यंत्र ' वापरले तर ही अडचण दूर होऊ शकेल. हे यंत्र पितळ आणि कृत्रिम रबर या दोन पदार्थांचा वापर करून बनवलेले आहे. आतापर्यंत झालेल्या चाचण्यांत हे यंत्र संपूर्ण यशस्वी ठरले आहे.

अखेर, चंद्रावर उतरणारा माणूस आणि नवा चंद्र या गोष्टीपेक्षा अनुल्लेखाने मारलेल्या या बातम्या आपल्या दृष्टीने अधिक मोलाच्या आहेत– डॉ. थॉमस आणि डेहराडूनचे संशोधक–ही विज्ञानेश्वरी आणि ' माणूस 'चे तमाम वाचक अभिमान बाळगून आहेत तुमचा. ○

 [ पृष्ठ २१ वरून ]

पण, जे कधी घडेल असे वाटले नव्हते ते घडले.

मुंबई महापालिकेने ' ललित कलादर्श 'चा, या नाटचसंस्थेच्या गेल्या अर्ध्या शतकाहून अधिक काळातील कार्याचा आणि कर्तृत्वाचा गौरव केला.

असा, एखाद्या मराठी नाटचसंस्थेचा गौरव करण्याचा प्रसंग मुंबई महानगरपालिकेच्या इतिहासात याआधी कधी घडला नव्हता.

मुंबई महापालिकेला ही बुद्धी कशी सुचली ?

एवढे औचित्य तिच्यात कोठून आले ?

नाटचसंस्थेचे व तिच्या कार्याचे मोल तिला कळले ?

कसे का असेना, कळले ! हे कळणे खरे महत्त्वाचे आहे. मोल आहे ते या जाणिवेचे.

' ललित कलादर्श 'चा असा गौरव झालेला पाहिला आणि मन कसे प्रसन्न होऊन गेले. आनंदित होऊन गेले.

' ललित कलादर्श ' या नाटचसंस्थेची साठ वर्षांची कारकीर्द हा मराठी मनाच्या कौतुकाचाच नव्हे तर अभिमानाचाही विषय ठरावा. एवढे दीर्घ आयुष्य दुसऱ्या कोणत्याच मराठी नाटचसंस्थेला लाभलेले नाही. या महाराष्ट्रात अनंत नाटचसंस्था जन्माला आल्या. त्यांतल्या कित्येक संस्थांनी मन दिपवून टाकणारे यश संपादन केले. वैभवाचे शिखर गाठले. अस्मानाएवढी कीर्ती मिळवली. त्या संस्थेची नाटके पाहायला एके काळी शंभरशंभर मैलांवरून लोक रेंग्यावैलातून येत होते. पण, हे एवढे लाभूनही त्या दीर्घजीवी होऊ शकल्या नाहीत. त्या साऱ्या कालाच्या उदरात गडप झाल्या.

मराठी प्रेक्षकाने रंगभूमीवर द्रव्य उधळताना हात कधीही आवरता घेतला नाही. दिलदारपणे त्याने दोन्ही हातांनी त्यांच्यावर द्रव्य उधळले होते. मराठी प्रेक्षकाने मराठी रंगभूमीवर खुल्या दिलाने अमाप प्रेम केले होते. पण, तरीही त्या नाटककंपन्या फार काळ चालल्या नाहीत. विपन्नावस्थेत त्यांतल्या नटांना आपले रंग पुसावे लागले.

असे का घडले ?

या प्रश्नाचे उत्तर शोधणे फारसे कठीण नाही. मराठी रंगभूमीचा इतिहास वरवर जरी चाळला तरी त्याचे उत्तर हाती लागते.

' ललित कलादर्श 'ने विपन्नावस्था पहिली नाही किंवा अनुभवली नाही, असे नाही. तिनेही खूप खाचखळग्यांतून वाटचाल केली आहे. तिनेही खूप उन्हाळे—पावसाळे भोगले आहे. ती वैभवात लोळली आहे; तसेच तिने दैन्यही पाहिले आहे.

पण, या साऱ्या घनघोर वादळांना तिने नेटाने आणि धीराने तोंड दिले. विलक्षण चिवटपणाने आणि निष्ठेने ती या संघर्षात लढली. दिग्विजयाला निघालेल्या वीरासारखी ती सारखी पुढेपुढेच चालत राहिली. 'बचेंगे तो और भी लढेंगे' असे म्हणणाऱ्या दत्ताजी शिंद्याचा बेदरकारपणा तिच्याजवळ होता. तिने घाव झेलले; पण ती थांबली नाही. ती पडली पण खचली नाही. मोडली नाही.

म्हणून तर ती साठ वर्षे जगली.

आणि नुसती जगलीच नाही, तर मानाने जगली.

ज्या काळात नुसते जगणेही कठीण होते त्या काळातही ती तगली.

ज्या काळात नुसते मान वर करणेही कठीण होते त्या काळातही ती मानाने जगली.

म्हणून तर तिची ही साठ वर्षांची वाटचाल मोलाची आहे.

म्हणून तर तिचा मुंबई महानगरपालिकेने केलेला सत्कार महत्त्वाचा आहे.

प्रत्येक कलावंतावर आणि कलानिर्मितिसंस्थेवर सामाजिक जबाबदारी असते. ते आपल्या कलेतून आणि कलानिर्मितीतून समाजाचे देणे फेडत असतात.

आणि त्यासाठी समाज त्यांचा कृतज्ञ असतो.

'ललित कलादर्श'च्या या सत्कारामागे कृतज्ञतेची हीच भावना होती. महापौर श्री. जमियतराम जोशी यांनी ती शब्दात बोलूनही दाखविली.

हा सत्कार मुंबईतील पंचावन्न लक्ष नागरिकांच्या वतीने करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

महापौरांच्या भाषणात, त्यांना 'ललितकलादर्श'ने केलेल्या साठ वर्षांच्या वाटचालीच्या महत्त्वाची जाणीव व्यक्त होत होती. 'ललित कलादर्श'च्या कर्तृत्वाचे कौतुक ओसंडत होते. तिच्या कार्याबद्दलची कृतज्ञता होती.

या सत्काराला 'ललित कलादर्श'च्या वतीने श्री. भालचंद्र पेंढारकर यांनी उत्तर दिले.

मुंबईचे आणि संस्थेचे ऋणानुबंध कसे घनिष्ठ आणि जुने आहेत हे जसे त्यांनी विशद करून सांगितले तसेच एक अत्यंत महत्त्वाची सूचनाही समोर मांडली.

प्रौढ मराठी रंगभूमीसाठी मुंबईत नाट्यगृहे उपलब्ध असली तरी बालरंगभूमीला डोके टेकवायला अजूनही या मुंबईत आपले म्हणावे असे स्थान नाही.

बालरंगभूमीकडे आम्ही नेहमीच दुर्लक्ष केले आहे. मराठी रंगभूमीच्या विकासाच्या दृष्टीने बालरंगभूमीची चळवळ जोपासणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे, ही गोष्ट आम्ही कधी मनावरच घेतली नाही. गेल्या काही वर्षांत त्या दृष्टीने तुरळक, व्यक्तिगत प्रयत्न व्हायला सुरुवात झाली आहे.

या प्रयत्नांना चळवळीचे स्वरूप येऊन ती जोपासली जायची असेल तर आधी तिला आपले स्वत:चे असे नाट्यगृह असणे आवश्यक आहे.

हे लक्षात घेऊनच श्री. भालचंद्र पेंढारकरांनी बालरंगभूमीला मुंबई महानगरपालि-

केने एक नाट्यगृह उपलब्ध करून देण्याची सूचना केली.
खरे म्हणजे, एकच काय, अशी खूप नाट्यगृहे उपलब्ध व्हायला हवीत. प्रत्येक उपनगरात असे नाट्यगृह हवे.
पण, ही फार पुढची गोष्ट झाली. आज एक मिळाले तरी चालेल.
श्री. पेंढारकरांनी दुसरी सूचना केली ती खुल्या नाट्यगृहातील सोयींसंबंधीची. मुंबई महानगरपालिकेने बांद्रा आणि राणीचा बाग येथे दोन खुली नाट्यगृहे बांधली आहेत. पण, त्यांत खूपच उणिवा राहिल्या आहेत. त्या उणिवा दूर करायला हव्या आहेत. नवीन नाट्यगृहे हवी आहेत.
हवे खूप आहे.
पण, प्रश्न हा आहे की, हे सारे मिळवायला आम्ही प्रत्येक वेळी सरकार आणि महानगरपालिकेकडेच का धाव घ्यावी ? ललित कलादर्श, साहित्य संघ, नाट्यसंपदा, गोवा हिंदू असोसिएशन, अशा मातबर आणि सुस्थितीत असलेल्या संस्थांनीच हे मनावर का घेऊ नये ? इतर लहानमोठ्या हौशी आणि व्यावसायिक संस्थांनी त्याच्या पाठीशी का उभे राहू नये ?
आम्ही जर हे मनावर घेतले तर बालरंगभूमीला तूर्त एक नाट्यगृह उपलब्ध करून देणे काही अशक्य होणार नाही आम्हांला.
श्री. पेंढारकर आपल्या भाषणात आणखीही बोलले. नाट्यव्यवसायात नव्याने शिरू लागलेल्या जातीयतेचा व प्रांतीयतेचा त्यांनी उल्लेख केला. सामाजिक उत्तरदायित्वाच्या जाणिवेची ग्वाही दिली.
असा हा प्रसन्न सोहळा.
हा सोहळा पाहिला आणि मन आनंदित होऊन गेले.
'ललित कालादर्श 'ला साठ वर्षे पूर्ण झाली. तिचा शतसांवत्सरिक महोत्सव पाहायला मिळावा, हीच मराठी प्रेक्षकांची मनोमन इच्छा आहे. ○


## निवेदन

कै. श्री. ना. ह. पालकर यांनी लिहिलेल्या 'डॉ. हेडगेवार' या चरित्रग्रंथाची प्रसिद्धिपूर्व सवलतीची मुदत वाढविण्याबद्दल मागणी होत आहे. परंतु त्यामुळे प्रसिद्धीची तिथीही पुढे ढकलावी लागेल व ते आम्हांस योग्य वाटत नाही. आमच्या प्रकटीकरणाप्रमाणे नोंदणी केलेल्या वाचकांना हा ग्रंथ श्रीदत्त-जयंतीपूर्वी हाती देण्यास आम्ही बांधले गेलो आहोत. त्यामुळे प्रसिद्धिपूर्व सवलत दि. १६–५–६९ ला बंद होत आहे. क्षमस्व.

हिन्दुस्थान साहित्य
३०९ शनिवार पेठ, पुणे २.

# तुमचे भविष्य

# आमचा अंदाज

## १० ते १६ मे राशिभविष्य

श्री. गो. जोशी सायनाचार्य

**मेष :** मानवी जीवनात दैवाचा भाग मोठा असतो, हे मान्य करूनही तुमचे चारित्र्य प्रयत्नांवरच आधारलेले आहे, असे म्हणावेसे वाटते. प्रयत्नवादी मनुष्य दैवावरही मात करू शकतो, याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे मेष राशी व्यक्तींचे जीवन.

सध्याचे आपले ग्रहमान अनुकूल नसतानाही आपण अनेक विजय मिळवून दाखवलेत. भविष्यकालही आशादायक आहे. सध्याच्या अनिष्ट ग्रहस्थितीचा परिणाम एवढाच की, आपणांस सतत अविश्रांत परिश्रम करावे लागतील, क्षणाची उसंत न घेता सतत पुढे जावे लागेल. हा आठवडा व्यावसायिक दृष्टीने थोडाफार प्रगतीचाच जाणवेल.

दि. १० ते १२ काही अनुकूल गोष्टी घडाव्यात.

**वृषभ :** मीनेचा शुक्र एकादशात–एवढा एक योगही मंगळाचा विरोध मोडून काढायला पुरेसा आहे. गेल्या आठवड्यातील अनेक स्थगित कार्यांना या आठवड्यात गती मिळू लागेल, विरोधाची धार काहीशी बोथट बनेल, व्यावसायिक मतभेद मिटण्याची लक्षणे दिसायला लागतील.

या वेळी संपूर्ण यश जरी पदरी पाडून घेता आले नाही तरी, निराश होण्यासारखे काही घडू शकणार नाही.

व्यावसायिक व सामाजिक मोठ्या जबाबदाऱ्या उचलाव्या लागतील. परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकणार नाही याची खात्री वाटू लागेल.

दि. १२ ते १४ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**मिथुन :** या वेळचे ग्रहमान आपणांस फारसे अनुकूल नसतानाही आपली पावले थोडीफार प्रगतीकडेच पडू लागतील. असे घडण्यात सिंहाचा वाटा तुमच्या परिश्रमांकडेच येतो.

जिवलगांच्या भेटीगाठी होतील, नवे स्नेहसंबंध जोडले जातील, अंगीकृत कार्यात घवघवीत यश मिळण्याची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागतील.

सांपत्तिक ताण खूपच वाढेल पण तुमचे सहसा कुठे अडून राहणार नाही. जवळपासचे प्रवास घडतील, मंगल कार्याचा अवघड प्रश्न सुटण्याची लक्षणे दिसू लागतील. हा सारा आठवडा खूपच धावपळीचा जाणवेल.

दि. १०–११–१४–१५ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कर्क :** सूर्य-बुध-शुक्र कधी नव्हते एवढे अनुकूल आहेत. त्यांचे हार्दिक सहकार्य घेऊन आपण वाटचाल करू लागणार असल्यामुळे येथून पुढे आपणांस अपयशाची भीती बाळगण्याचे मुळीच कारण नाही. उलट मी असेही म्हणेन की, हाच एक काल असा आहे की, जो तुमच्या कर्तृत्वावर मानाचा तुरा खोवून जाईल.

उद्योगधंद्याचे नवे क्षेत्र हस्तगत होईल, नोकरीधंद्यातील स्थान उंचावेल. प्राप्ती आणि प्रतिष्ठा अपेक्षेबाहेर उंचावेल. नव्या प्रांतात पदार्पण घडेल.

दि. १३ ते १५ अपेक्षित यश पदरी पडावे.

**सिंह :** चौथ्या मंगळाचा धिंगाणा सुरूच आहे. या अनिष्टतेचे आता आपणांस फारसे वाटणार नाही. त्यावर काही तोडगा काढण्यात यशस्वी ठराल. अजूनही काही दिवस झगडत वाटचाल करावी लागणार आहे. पण अपयशाची भीती बाळगण्याचे कारण नाही.

सांपत्तिक ताण पूर्वीप्रमाणेच वाढत राहील. दैविक कृपा व थोरांचे साहाय्य कोणत्याही क्षणी लाभेल आणि त्यामुळेच या अनिष्ट कालावर आपण विजय मिळवून दाखवाल.

मुख्यतः दि. १३ ते १६ या काळात अनेक कार्यात आपण यश मिळवाल.

**कन्या :** सूर्य भाग्यस्थानी येत आहे–आल्यासारखाच आहे. बुधही त्याच्या सान्निध्यात आहे. ही ग्रहस्थिती तुम्हांला तुमच्या अपेक्षेबाहेर यश देऊन जाईल. या आठवड्यापासूनच तुमचा धावता दौरा सुरू होईल, अनेक योजना आकार घेऊ लागतील. निवडणूक, सभा-संमेलने गाजवली जातील, चारित्र्याला निश्चित उत्थान मिळेल.

कला-साहित्य-संशोधन-राजकारण या साऱ्याच क्षेत्रांत आघाडीवर राहण्याचा मान मिळेल. गेल्या कित्येक महिन्यांपासून उराशी कवटाळलेली स्वप्ने साकार व्हायला लागतील. व्यावसायिक क्षेत्रात अनन्यसाधारण यश सहजासहजी पदरी पडेल.

दि. ११ ते १४ या कालाचे महत्त्व सर्वांत अधिक जाणवेल.

**तूळ :** अजूनही काही काल आपणांस जपून पावले टाकावयास हवीत. वक्री

मंगळाची अवस्था नाही म्हटले तरी थोडीफार तरी जाणवल्याशिवाय कशी राहील ? मुख, नेत्रविकार तीव्रतेने जाणवायला लागतील. सांपत्तिक तटबंदीला खिंडार पडेल आणि ते बुजविण्यास लागणारे मनोधैर्यही तुमच्या ठिकाणी अभावानेच असेल.

पण वेळ निभावून जाईल. चारित्र्य निष्कलंक राहील. प्रतिष्ठेवर होणारे हल्ले यशस्वीपणे थोपविले जातील. ऐन वेळी अनेकांचे साहाय्य लाभेल. वैचारिक संघर्ष मिटण्याची लक्षणे दिसू लागतील.

दि. ११ ते १४ या काली थोड्याफार अनुकूल घटना घडाव्यात.

**वृश्चिक :** गुरु-शुक्रांची सहानुभूती तुम्हांला कोणत्याही, कसल्याही पेचप्रसंगा-मधून सोडविण्यास उपयोगी पडावी. हे दिवस स्वास्थ्याचे नव्हेतच; पण अपयशाचे खासच नाहीत. साध्या गोष्टींसाठी अविश्रांत परिश्रम करावे लागतील. अनेकांचे हार्दिक सहकार्य मिळूनही मनाची तगमग सतत जाणवत राहील.

तुमच्या राशीमध्येच मंगळाचे दीर्घकालीन वास्तव्य, शिवाय त्याची वक्री अवस्था यामुळ कोणतेही यश पदरी पाडून घेण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल.

दि. १३ ते १५ विशेष यश पदरी पडावे.

**धनू :** या वेळची ग्रहस्थितीच अशी आहे की, उद्‌भवणाऱ्या अडचणींमधून, कोसळणाऱ्या संकटांमधून निर्विघ्नपणे पार पडू शकाल. व्ययातील वक्री मंगळही अशी एक चमत्कारिक अवस्था आहे की, तिच्यामुळे आपण अगदी दिङ्मूढ बनाल. सांपत्तिक खर्चाचा प्रचंड लोंढा थोपविणे आवाक्याबाहेर होऊन बसेल. सहकार्याचे हात थिटे पडतील. लोकांनी दिलेली अभिवचने साफ खोटी पडू लागतील.


क्र. ४८ मध्ये बिनचूक कोणीच नाही

क्र. ५०
मध्ये जिंका **रु. ५००,०००**

८ जून रोजी चवथ्या वर्षात पदार्पण

**क्र. ५१. मध्ये भव्य बक्षीस**

प्रवेश–पत्रिका आणि पावत्या ठिकठिकाणी एजन्टांकडे मिळतात.

अधिकृत एजन्ट : श्री. धुळालाल शाह, बुधवार चौक, पुणे २

या वेळी एकच एक आशास्थान, दशमातील गुरू. तो या प्रसंगावर तोडगा सुचवील. वेळप्रसंगी मदतीचे हातही पुढे करील. व्यवसायधंद्यातील फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका.

दि. १२ ते १५ थोडेफार सहकार्य लाभावे.

**मकर** : आजवर अनेक ग्रहांचे आपणांस सहकार्य लाभलेले आहे—या आठवड्यात बुध-शुक्रांच्या अनुकूलतेची त्यात आणखीन भर—हा मणिकांचन योगच !

आता तुमच्या कोणत्याही कार्यात अपेक्षेबाहेर यश लाभू शकेल. मंगलकार्याचा प्रश्न अपेक्षेप्रमाणे सोडविला जाईल. दैविक कृपेचा हातोहात प्रत्यय यायला लागेल.

या कालखंडाचे माहात्म्यच असे आहे की, कुठेही गेलात, काहीही केलेत तरी ते अपेक्षेबाहेर यश घेऊन उठेल. इष्टमित्रांच्या भेटीगाठी होतील. नवे स्नेहसंबंध जुळून यायला लागतील. काहींच्या जीवनात 'प्रीतिसंगम'ही घडावा.

दि. १२ ते १५ हा संस्मरणीय काल होय.

**कुंभ** : दशमातील मंगळाचे अचाट सामर्थ्य आपल्या पाठीशी उभे असल्यामुळे अंगीकृत कार्यात विजयावर विजय मिळविणे फारसे अवघड नाही. सामाजिक–राजकीय क्षेत्रांत तर तुमचाच आवाज सर्वत्र उठू लागेल. असे असले तरी परिश्रम आणि दगदग ही काही कमी होणार नाहीच. सतत प्रयत्नशील राहणे हा तुमचा स्थायीभावच !

अवघड जबाबदाऱ्या आता समर्थपणे पेलू शकाल. माघार घेण्याचा प्रसंग चुकूनही कधी येणार नाही.

दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवावे लागेल. नव्या योजना आत्मविश्वासाने हाताळाव्या लागतील. प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात याव्यात.

दि. १३ ते १५ विशेष अनुकूल काल.

**मीन** : आजवर आपणांस गुरु-मंगळांचेच साहाय्य मिळत होते. आता सूर्यही आपल्या पराक्रमात येणार आहे. आता तुमची पावले निश्चितपणे प्रगतीकडे पडू लागतील. साहित्याच्या प्रांतात, वैज्ञानिक क्षेत्रात तुम्हांला कोणी प्रतिस्पर्धीच उरणार नाही.

सभासंमेलनांत भाग घ्यावा लागेल. ग्रंथलेखन हातून घडेल. उत्स्फूर्त कल्पना पुढे ठेवल्या जातील आणि यामुळे उत्तुंग यशाचे धनी व्हाल. तुमचा अनिष्ट काल आता इतिहासजमा झाला, असे समजायला हरकत नाही. प्रवास सतत करावा लागेल.

दि. १२ ते १४ नोंद करण्यासारखा महत्त्वाचा काल. ○

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस, प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

आ गारयतके पद एकबार फिर उठा दे
बिछडोंको फिर मिला दे नक्शे दुई मिटा दे

सूनी पडी हुई है मुद्दतसे दिलकी बस्ती
आ एक नया शिवाला इस देशमें बना दे

दुनियाके तीरथोंसे ऊँचा हो अपना तीरथ
दामाने आसमांसे उसका कलस मिला दे

हर सुबह उठके गाएं मंतर वह मीठे मीठे
सारे पुजारियोंको मय पीतकी पिला दे

शक्ती भी शान्ती भी भक्तोंके गीतमें है
धरतीके बासियोंकी मुक्ती प्रीतमें है ।।

पण मला मात्र मातृभूमीच्या कणाकणांत देवतांचे दर्शन घडते.

ये, आपण एकमेकांना भेटू या आणि दुराव्याचे पडदे काढून टाकून आज एकमेकांपासून जे फुटले आहेत त्यांना जोडून टाकू या!

किती दिवसांपासून आपल्या हृदयाची दुनिया विराण आहे. ये, आपण मिळून या देशात एक नवे शिवालय बांधू या. आपले शिवालय हे जगातील सर्वोच्च तीर्थ ठरेल. त्या शिवालयाचा कळस गगनाला जाऊन भिडेल. या शिवालयात रोज प्रातःकाळी पुजारी मंजुळ मंत्र म्हणतील. या पुजाऱ्यांना प्रेमाचा मधू पाजू या.

या शिवालयातील भक्तांच्या गीतांमध्ये शक्ती आणि शांती या दोघांचाही संगम साधला जाईल. धरतीच्या लेकरांची मुक्ती प्रीतीनेच साधली जाईल.

**महाकवी महंमद इक्बाल यांना अभिप्रेत असणाऱ्या अशा एका नव्या शिवालयाकडे, स्वप्न-मंदिराकडे निघालेले एक सश्रद्ध यात्रिक, भारताच्या महान् सहिष्णू परंपरेचे एक जाणकार उपासक, राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन यांना 'माणूस'ची नम्र श्रद्धांजली............**

—संपादक